## दीपावली शुभचिंतन

आमच्या सर्व श्रीसाईभक्तांना श्रीसाईलीलेच्या वर्गणीदारांना, लेखकांना, कवींना ही दीपावली व नूतन वर्ष सुखाचे, समृद्धीचे व उत्कर्ष आणि भरभराटीचे जावो. सर्वांनी केलेले सर्व प्रकारचे संकल्प सिद्धीला जावोत. सर्व प्रकारची यशप्राप्ती त्यांना प्रत्येक कार्यात लाभो ही शुभेच्छा या मंगल प्रसंगी व्यक्त करतो.

**श्रीसाईलीलेचा यापुढील अंक जानेवारी १९७७ मध्ये प्रकाशित होईल.**


**श्रीसाईंच्या असंख्य भक्तांसाठी**
**अत्यंत सोप्या भाषेत, प्रासादिक व अल्पवेळात**
**नित्य पठण करता येईल असे ओवीबद्ध**

# श्रीसाई महिमामृत

**लेखक : मधुकर भीमाशंकर देशपांडे,** बी. ए. (ऑ.)

**साईज–डेमी, अध्याय २१, पृष्ठे ११२, मूल्य रुपये ५ फक्त**

–: प्रमुख विक्रेते :–

मे. ल. ना. गोडबोले, बुकसेलर्स, लक्ष्मी रोड, पुणे २.
मे. अभिनव पुस्तक मंदिर, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणे ४.
ग्रंथ रजिस्टर्ड बुकपोष्टाने पाहिजे असल्यास खालील
पत्त्यावर रुपये ७–२५ पै. ची मनीऑर्डर करावी.
म. भी. देशपांडे, ३३ कसबा पेठ, पुणे ११.

# स्वानुभव विशेषांकाचे मानकरी

१) स्वामी संजयानंद, हिमालय,
२) श्री. अनंत पितांबर, अहमदनगर,
३) प्रा. ए. एम. अमीनगड, गुळुंचे,
४) प्रा. र. श्री. पुजारी, पुणे
५) डॉ. अनिल जायस्वाल, नागपूर
६) श्री. मधुकर देशपांडे, पुणे
७) डॉ. श्या. शं. तेंडुलकर, पुणे.
८) श्री. डी. आर. खडके, चेंबुर
९) श्री. सी. डी. सामंत, मुंबई
१०) श्री. डी. बी. पोतनीस, पिंपरी
११) श्री. सूर्यकांत गर्जे, पुणे
१२) कु. पुष्पलता मोहरे, बिलासपूर
१३) सौ. कमल सांडभोर, पुणे
१४) श्री. बाळाराम पवार, मुंबई
१५) श्री. रमेश चव्हाण, नवापूर
१६) श्री. अंबाजीराव सरोदे, दादर
१७) सौ. अहिल्या उपरकर, माझगाव
१८) श्री. बापूसाहेब निरखे, इंदूर
१९) श्री. के. रा. थालगांवकर, नागपूर
२०) श्री. स. वे. जोशी, सिकंदराबाद
२१) श्री. पांडुरंग मिराशे, किनवट
२२) सौ. प्रमोदिनी देशमुख, तळाशेत,
२३) सौ. छाया जाधव, मुंबई,
२४) श्री. रामजी पारटकर, पवना,
२५) श्री. ए. बी. पटवर्धन, गोरेगाव
२६) श्री. यशवंत म्हसळकर, ठाणे
२७) सौ. मंदा शहा, धुळे
२८) श्री. माधव गोरे, कुर्ला
२९) श्री. वसंत फरतोडे, खार
३०) श्री. शशिकांत नाईक, बांद्रा
३१) सौ. सरला गर्जे, पुणे
३२) लीलाताई गोलतकर, भायखळा
३३) श्री. आर. बी. वाढीवकर, गोरेगाव
३४) श्री. वि. सी. उतेकर, विक्रोळी
३५) सौ. आशा इंगळे, गोरेगाव
३६) श्री. विलास कुलकर्णी, कोल्हापूर
३७) कु. हिरा पटवारी, बिदर
३८) सौ. यशोधरा वागळे, गिरगाव
३९) कु. शशिकला बोरवणकर, ठाणे
४०) श्री. दशरथ तळेकर, कुलाबा
४१) श्री. राधाकृष्ण गुप्ता चेतन, डोंबिवली
४२) श्री. दत्ताराम वारस्कर, मुंबई
४३) श्री. लिलासिंग मंडाले, धुळे
४४) श्री. रामचंद्र अ. देशमुख, शिर्डी
४५) श्री. दत्ताराम बा. कांबळे, सातारा
४६) श्री. अमृतराव नलावडे, हैद्राबाद
४७) कुमार सुनिलदत्त सांडभोर, पुणे
४८) श्री. शांताराम गो. कदम, भायखळा
४९) श्री. श्रीराम सातर्डेकर, परळ
५०) श्री. पांडुरंग भुजबळ, सातारा
५१) श्री. पी. आर. जोशी पुणे
५२) श्री. कालीदास रांगोळे, कोपरगाव
५३) श्री. भ. धों. कुंभकर्ण, मुदखेड
५४) श्री. ढापरे, गुजरात राज्य
५५) श्री. काशिनाथ लक्केवार, म. प्रदेश
५६) सौ. उषा कर्णिक, अहमदाबाद
५७) नंदकुमार गायकवाड, गुळूंचे
५८) श्री. किसनराव वंगाळे, नांदेड
५९) श्री. दिनकर सपकाळ, ग्वाल्हेर
६०) श्री. रामचंद्र दमकोंडावार, बल्लारपूर

# श्रीसाईलीला-दिवाळी अंक

## भक्त स्वानुभव विशेषांक



जन्म जन्मांतरी असेल पुण्यसामुग्री।
तरीच नाम जिव्हाग्री येईल श्रीसाईंचे॥

धन्यकुळ तयाचे साईनाम हेचि वाचे।
दोष हरतील जन्माचे श्रीसाई म्हणतांची॥

कोटी कुळाचे उद्धरण मुखी साईनाम।
साई साई स्मरण धन्य जन्म तयाचे॥

# भक्त संरक्षक साईबाबा

**स्वामी संजयानंद**
वेदनिकेतन धाम, हृषिकेश

● भक्तांवर जेव्हा संकट येते, तेव्हा भक्त संरक्षक परमेश्वर श्रीसाई त्या संकटाचे कसे निवारण करतात त्याचा हा प्रत्यक्ष पुरावा.

नंदुरबार जिल्हा धुळे येथील ही सत्यकथा आहे. दिनांक १९–३–७५ बुधवार रोजी नंदुरबार बँक ऑफ बरोडाचे मॅनेजर श्री. जे. व्ही. महात्मे व तेथील दत्त मंदिराचे पुजारी श्रीकृष्ण त्रिवेदी आणि साई भक्त श्री. स्वामी संजयानंद व त्यांची पत्नी सौ. मीरा व कल्पना गॅरेजचे मेकॅनिक श्री. अर्जुन ही मंडळी मोटारीत बसून दत्त मंदिरात गेली. तेथे श्री. स्वामी संजयानंद यांनी दोन भजने गाईली. नंतर तेथून सर्व मंडळी मोठा मारुतीचे दर्शन घेऊन नंदूरबार धुळे रोडवर फिरावयाला गेली. रात्रीची सव्वा नऊ, साडे नऊची वेळ होती. फिरुन परत येत असताना, गाडीत बसलेली मंडळी बाबांच्या विषयी सत्संग करीत होती; इतक्यात मोटारीचे पुढील डाव्या बाजूचे चाक अचानक निखळले, ते आत बसणाऱ्यापैकी कुणालाही समजले नाही.

गाडीचा वेग थोडा कमी झाल्यावर निघालेले चाक मोटारीच्या उजेडात पुढे पळताना दिसले. श्री. महात्मे यांनी ते पाहिले व मोटर चालवणाऱ्या ड्रायव्हर श्री. अर्जुनाला सांगितले की, चाक चालले आहे. आत बसणाऱ्याना वाटले की, दुसऱ्या गाडीचे चाक असावे. परंतु मागे पुढे पहाता कोणतेही वाहन नव्हते. तेव्हा त्यांच्या लक्षात आले की, हे चाक आपल्याच मोटारीचे असावे. तोपर्यंत गाडी एक फर्लांग तीन चाकावर अगदी आरामात चालून आली. चाक निघाल्याचे लक्षात येताच गाडीतील मंडळीनी साईराम साईराम जप सुरु केला. ड्रायव्हर अर्जुनाने ब्रेक लावला व गाडी अलगद थांबली. आतील मंडळी हसतच दार उघडून बाहेर पडली. गाडीचे व आतील मंडळींचे काहीही नुकसान झाले नाही.

इतक्यात धुळे नंदूरबार जाणारी एस. टी. आली. दोन तीन मालट्रक, जीप येऊन थांबली. मोटारीला काय अपघात झाला हे पहावयास आतील प्रवासी खाली उतरले. हा प्रसंग सर्वांनी ऐकल्यावर त्या सर्वांना आश्चर्य वाटले. त्या सर्वांनी हेच सांगितले की, तुम्हाला परमेश्वराने वाचविले याच्यात काही शंका नाही. ही सर्व मंडळी मिळून १५–२० माणसे सतत एक तास चाक शोधत होती. पण चाक काही

सापडले नाही. मालट्रकच्या ड्रायव्हरने मोटारीतील स्टेपनी लावून दिली. ही मंडळी घरी सुखरुप आली. नंतर साईबाबांचे भजन करून सर्वांना प्रसाद वाटला. दुसरे दिवशी सकाळी एका माणसाने हरविलेले चाक आणून दिले. ही बातमी गावात सर्वत्र झाल्यावर सर्वांनाच कमालीचे आश्चर्य वाटले, कारण मोटारीचे पुढील चाक निघाले असता अपघात टळत नाही. परंतु साईकृपा असल्यावर अशक्य काहीच नाही.

कौन छुयेगा उसकी परछाई ।
जिसको बचानेवाला साई ।।

# बाबा भक्तांना ज्ञानप्रकाश देतात

श्री. अनंत जयदेव चितांबर
२०४, दिल्ली दरवाजा जवळ, अहमदनगर

● श्रीसाईबाबा प्रत्यक्ष श्रीकृष्ण परमात्मा आहेत. ते भक्तास बुध्दियोग देतात आणि त्यांचे अज्ञान स्वतः ज्ञानदीप होऊन नष्ट करतात, व मोक्षपदास प्राप्त होण्यास मार्ग दर्शवितात व त्यांच्या स्वतःशीही ऐक्यभाव निर्माण करतात. मात्र त्यांना अनन्य भक्तीने शरण गेले पाहिजे. हा अनुभव बाबांनी मला अलीकडच्या काळात दिला आहे. माझ्या सारख्या अल्पबुद्धि असणाऱ्या अगदी क्षुल्लक माणसाकडून बाबांनी 'श्रीमद्‌भगवद्‌गीतेचा अभ्यास', हे पुस्तक लिहून घेतले व ज्ञानेश्वरीच्या अभ्यासात ज्ञानदीप होऊन मार्ग दाखवून ते प्रसिद्धही करवून घेतले. ही केवढी त्यांची कृपा. हे पुस्तक मूळ लिखित त्यांचेच समाधीवर ता. ३१-८-७२ रोजीच्या श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या उत्सवप्रसंगी जन्मवेळीच अर्पण केले व जो अनुभव आला तो वाचेने सांगता येणार नाही. 'बुद्धिग्राह्यमतींद्रियम', असा तो लाभ होता. ह्या पुस्तकास बाबांच्याच मार्गदर्शनाने श्री.ह.भ.प. अनंत महाराज आठवले श्रीदासगणू महाराजांचे शिष्याग्रणी यांची प्रस्तावना, दासगणू आश्रमात पंढरपूर येथे पंढरीनाथाचे त्रिरात्र दर्शन घेऊन पंढरीनाथाच्या चरण स्पर्शाने पुनीत होऊन प्रसाद म्हणून मिळाली. आश्चर्य हे की या पुस्तकाचा गाजावाजा न करताही दोन हजार प्रतींपैकी दीडहजार प्रती भगवद्‌भक्तांनी घेतल्या. पुस्तक विक्रीचा धंदा म्हणून न करता स्वतः प्रचार करून ज्याची इच्छा होईल त्यांनीच घ्यावे या प्रचाराच्या मार्गाने जे साध्य होईल तेवढे केले. गीतार्थ प्रसाराची

स्फूर्ति बाबांनी देऊन तो प्रसार सतत आयुष्यभर करण्याचा उत्साह ते मला सतत देत आहेत. गीतार्थाचा अनुभव घ्यावयाचा असतो. नुसत्या शाब्दिक पांडित्याने तो कधीच मिळणार नाही. बाबांना मी लहानपणी शिर्डी येथे स्वतः माझ्या ८व्या वर्षाच्या वया-पर्यंत पाहून चरणांवर मस्तक ठेवून दर्शन घेतलेले आहे आणि बाबांनी आशीर्वादही दिलेला आहे. यापेक्षा परम भाग्य ते कोणते ? परंतु मनुष्य आपले संचित विसरत असतो व तो परमेश्वरालाच दोष देत असतो, हा मनुष्यस्वभाव जगाच्या रहाटीत दिसून येतो. संत तुकाराम महाराज किती महत्त्वाचा उपदेश करतात तो पाहा. मनुष्याने आत्म-परिशीलन केले पाहिजे :-

पापाची संचिते देहासी दंडण । तुज नारायणा बोल नाही ॥
पेरीकडू जिरें मागें अमृतफळें । अर्का वृक्षा फळें कैसी येती ॥
सुख अथवा दुःख भोग हा देहाचा । नास हा ज्ञानाचा करूं नये ॥
तुका म्हणे आतां देवा कां रुसावें । मनासी पुसावें काय केले ॥

तात्पर्य - ज्ञानाचा नाश करू नये

बाबांच्या कृपेने प्रारब्धाचा नाश होवो हीच त्यांच्या चरणीं प्रार्थना : ●

# बाबा घरी आले

**प्राचार्य श्री. ए. एम. अमीनगड, गुळूंचे**

● तीन चार वर्षांपूर्वीची गोष्ट. दिवस गुरुवारचा होता. वेळ सकाळी साडे नऊ-दहाची. गुरुवारचा उपवास असल्यामुळे आमच्या मावशी दारासमोरच फराळ करत बसल्या होत्या. माझा गुरुवारचा उपवास नसल्यामुळे मी जेवत बसलो होतो. वडील काही कामानिमित्त पुण्याला गेले होते. आई स्वयंपाक करीत होती.

आमचे घर रस्त्याच्या कडेलाच होते. इतक्यात एक साधू दाराशी आला. तो दिवस गुरुवारचा असल्यामुळे आणि आमच्या मावशी समोरच फराळ करीत बसल्यामुळे 'फराळाचे वाढू का ?' म्हणून माझ्या मावशीने विचारले. पण तो फक्त, 'मुझे सिर्फ चावल दो–' एवढेच म्हणाला. मावशीने वाटीभर तांदूळ वाढले. त्या बरो बरच तो साधु– 'अल्ला तुम्हारा भला करेगा–' एवढेच म्हणाला. पण आमच्या मावशींचा थोडा चौकशीचा स्वभाव. त्या म्हणाल्या, 'आपण कोठून आलात ?' असे विचारले. त्या बरोबर तो साधू म्हणाला– 'मैं शिरडी से आया हूँ ।' एवढे म्हणून तो

थांबला नाही, निघून गेला. तो साधू गेल्यावर आमच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. ते बाबाच असावेत. नंतर आम्ही त्या साधूबाबांना शोधण्याचा खूप प्रयत्न केला. पण छे: ते कुठले सापडायला ! ते सापडले नाहीत. आम्ही सर्व साई भक्त आहोत– अशी आहे 'बाबांची' किमया. ●

# तो अनोळखी इसम....

प्रा. र. श्री. पुजारी
९९२, रमा निवास, पुणे ३०.

● गेल्या डिसेंबरमधील गोष्ट. पुण्याहून मी मुंबईस आलो होतो. लालबाग येथील श्रीसाईनाथ सेवा मंडळाच्या रौप्य–महोत्सवात वक्ता म्हणून भाग घेणार होतो, शिरडीहून श्रीबाबांच्या पादुका आल्या होत्या. दर्शनासाठी त्या जयहिंद सिनेमाच्या आवारात ठेवल्या होत्या. भक्त येत होते. दर्शन घेऊन जात होते.

दि. १३ डिसेंबर रोजी संध्याकाळी पादुकांच्या दर्शनासाठी मी तेथे गेलो दर्शन घेतले. प्रसाद घेतला. मग बाहेर येऊन मनाशी विचार केला की उद्या. संध्याकाळपर्यंत मला येथे काहीच काम नाही. तर आता येथून निघावे आणि एक व्यक्तिगत काम करावे. परळ येथील आंबेकर नगरात जाऊन मेहुण्यांची भेट घ्यावी. त्यांच्याशी दोन घटका गप्पागोष्टी करून मग सावकाशपणे उतरल्या ठिकाणी म्हणजे दादर येथील साईनिकेतनात जावे.

जयहिंद सिनेमाच्या समोरच बस–स्टॉप. परळला जाणाऱ्या बसची वाट पाहात मी तेथे उभा राहिलो. जवळ जवळ अर्धा तास होऊन गेला, पण एकही बस तेथे थांबेना. जी बस येई ती गच्च भरून, जाई ती तेथे न थांबताच !

मी कंटाळलो. माझ्या रांगेतील लोकही कंटाळले. स्वतःशी काही पुटपुटत तेथून काढता पाय घेऊ लागले. अन्य वाहन थांबवून किंवा पायीसुद्धा निघाले.

उरता उरलो आम्ही दोघेच. एक मी आणि दुसरा माझ्या शेजारचा एक इसम.

पुण्यातील अंतरे मुंबईच्या मानाने तशी कमी. पुण्यात मला तशी दोन तीन मैल सहज चालण्याचीही सवय. तेवढा व्यायाम शरीरास आवश्यकच. म्हणून त्या इसमास मी म्हणालो, " तुम्हास कोठे जायचे आहे ! माझ्या बाजूस येत असाल तर आपण पायी जाऊ. "

त्या माणसालाही परळच्या बाजूसच जायचे होते. म्हणून तो म्हणाला, "चला पाच–दहा मिनिटांचा तर रस्ता."

अनेक वेळा येऊनही मुंबईस मी तसा अनोळखीच. रस्ते नीट माहीत नाहीत. चुकण्याचीही शक्यता, त्यातून तिन्हीसांजेची वेळ झालेली. अंधार झपाट्याने पडू लागलेला. म्हणून निघण्यापूर्वी त्या माणसाची विश्वसनीयता मी पुन्हा एकदा पारखून घेतली. पण तो मनुष्य सभ्य दिसला. त्याची भाषा, पोषाख, वागणे यातही आदब दिसली. हे सर्व ध्यानी घेऊनच त्याच्याबरोबर जाण्यास मी तयार झालो. निघालो.

तो माणूस मुंबईतीलच. लालबाग–परळ भागातीलच. माझा एक हात धरून वेगवान गर्दीचे रस्तेसुद्धा पळत पळत मोठ्या लीलेने तो ओलांडू लागला. मोठ्या आदबशीर पणे, जिव्हाळ्याने बोलतबोलत, काही मिनिटांतच, मधल्या रस्त्याने त्याने मला के. ई. एम. हॉस्पिटलच्या समोर आणले. मग तेथील मुख्य फाटकात उभा राहून पुन्हा त्याच सौजन्याने तो मला म्हणाला, 'मी इथे हेड वॉचमन आहे.'

मग समोरचा आडवा रस्ता ओलांडता ओलांडता तो म्हणाला, 'येथे कोपऱ्यावर माझी खोली आहे. आम्ही सर्वजण ब्रम्हचारी लोक तेथे राहतो. कोणी अडचणीत असेल त्याला मदत करतो. केवळ माणुसकीचा धर्म म्हणून.'

मी त्याच्या खोलीवर यावे, निदान कोपऱ्यावरच्या हॉटेलमध्ये त्याच्या समवेत चहा-कॉफी-लेमन असे काही घ्यावे अशी इच्छा. ती त्याने मोठ्या आदबशीरपणे प्रकट केली. पण मी साभार नकार दिला आणि त्याने दाखविलेल्या समोरच्या रस्त्याने झपाट्याने निघालो.

तरीही त्या माणसाचे सौजन्य ओसरेना. तो म्हणाला, 'आज एक राहो. तुम्ही घाईत आहा. पण पुन्हा याल तेव्हा माझी चौकशी या कोपऱ्यावर करा. कोणीही तुम्हाला माझे नाव सांगेल.'

मी मनाशी म्हणालो : बाबारे ! मी कशाला पुन्हा या कोपऱ्यावर येतो ! आज आलो तोही काही निमित्ताने ! कित्येक वर्षांनी !

निघालेल्या मला त्याने पुन्हा थांबविले. आपले छापील परिचय कार्ड माझ्या हाती दिले. पुन्हा तेच अगत्याचे शब्द तो बोलला. म्हणाला, 'पुन्हा याल तेव्हा माझ्याकडे या हं. मी येथेच असतो.'

दुसऱ्या का तिसऱ्या दिवशी त्या कार्डाची आठवण मला झाली. ते कार्ड मी वाचून पाहिले. प्रकृतीच्या तपासणीसाठी कोणास तरी ८ जानेवारी १९७६ या दिवशी संध्याकाळी के. ई. एम्. हॉस्पिटलमध्ये बोलावले होते. ज्याला बोलावले होते त्याचे नाव वर नव्हते. खाली आर. एम. ओ. ची सही मात्र होती.

मला क्षणभर हसू आले. कार्डांची अदलाबदल स्पष्टपणे जाणवली. तरी पण येऊ नये तो विचार मनात आला. तो असा की हे बोलावणे मला स्वतःलाच आलेले तर नव्हे! जगातील गूढ, अज्ञात शक्ती कोणता संदेश, कोणास, कोणामार्फत, केव्हा देतील काय नेम सांगावा.

पण ते बोलावणे माझ्यासाठी नव्हते. कोल्हापूर येथे राहाणाऱ्या माझ्या मावस-भावासाठी होते. ते त्यालाही त्यावेळी अकल्पित होते. साहजिकच त्याच्याबरोबर अगदी अकल्पितपणे जानेवारी महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात मी पुन्हा मुंबईस आलो. आठ दिवस के. ई. एम्. हॉस्पिटलमध्ये तो होता. नवव्या दिवशी आम्ही मुंबई सोडली.

मुंबईस के. ई. एम. च्या समोरील कोपऱ्यावर शांतिभुवन लॉजमध्ये आम्ही उतरलो होतो. पुढे दोन दिवसातच तो सर्व परिसर माझ्या ध्यानी आला. तेथे त्या इसमाची मी कसून चौकशी केली. पण त्या नावाचा, वर्णनाचा किंवा हुद्याचा कोणी माणूसच तेथे नव्हता !

अजूनही ते कार्ड माझ्या जवळ आहे. त्या इसमाने ज्या कोपऱ्यावर मला ते कार्ड दिले, तो कोपराही माझ्या चांगला स्मरणात आहे. कारण त्याच कोपऱ्यावर शांतिभुवन लॉज आहे !

एक गोष्ट मात्र खरी की याच शांतिभुवनमध्ये श्रीबाबांची उपासना आठ दिवस अहोरात्र आमच्या हातून घडली. पूर्वनियोजित असावी तशी त्यांनी करवून घेतली.

त्या उपासनेनेच आमचे धैर्य शेवटपर्यंत टिकविले. ●

# नारळ सडका निघाला

( व्यंगात्मक–अनुभव )

— डॉ. अनिल जायस्वाल
श्रीसाई क्लिनिक, चितारओळ, नागपूर-२.

● " अगं ये ! किती वेळापासून ओरडून राहिलो एकसारखा, परंतु ही आपल्या स्वयंपाकघरातच खुष. काल रात्रीच झोपताना सांगितले होते की आज रामनवमी म्हणून. आज शिर्डीत म्हणे फार मोठा उत्सव असतो. हजारो भक्त दूरदूरून येतात. म्हटलं ऽ आपणही आपल्या इथे बाबांची रामनवमी साजरी करावी. परंतु आपण

इच्छिलेली गोष्ट या घरी कधी पूर्ण होईल तर शपथ म्हणाव... अगं आण न फुलवात झाली असेल तर ऽऽ!"

" अरे! काय म्हटलं ? गज्जू दलाल आलेत. बसव, त्यांना बसव. बाबांस नैवेद्य वगैरे दाखविण्याकरिता तुझी आई शिरा वगैरे तैयार करीतच असेल. तोच त्यांना दे म्हणावं... पाणी दे. चहा दे. आलो. आरती वगैरे संपवून लगेच येतो म्हणावं...'

" काय हो बाबा! आपणास तर माहीतच आहे. मी आपला एक फार जुना भक्त माझा विश्वास तर फक्त आपल्याच ठायी जडलेला आहे. आपणही साधे भोळे. आपली पूजा विधीही साधी-सोपी. व्यर्थ आडम्बर आपणास मुळीच आवडत नाही. ... मीसुद्धा वेळात वेळ काढून कसेतरी न चुकता, मागील नऊ वर्षापासून, शिर्डीची वारी नियमीत-पणे करीतच असतो. तेव्हापासून दरखेपेस मी एकशे आठ रुपये गुप्तदान म्हणून आपल्या समाधी मंदीरातील पेटीत मुळीच का कू न करता कोंबतो. इतर भक्त तर आपणास पाच-पाचशे रुपये दक्षिणा देतात. पावत्या घेतात. आपले नाव पण त्यात नमूद करून घेण्यास ते कधीच विसरत नाहीत. पण बाबा! आपणच पाहता मी किती साधा! माझी भक्ती किती साधी निर्मळ! दरवर्षी आपल्या दर्शनास आल्यावर ज्याप्रमाणे लोक शिवलिंगावर एकशे आठ बेलपत्र वाहतात, त्याचप्रमाणे मी आपल्या दक्षिणा पेटीत नवीन करकरीत एक-एकच्या नोटा अष्टोत्तर नामावली वाचून टाकीत असतो..."

" बाबा! आपण अंतरज्ञानी व त्रिकालदर्शी आहात. यात मुळीच अतिशयोक्ति नाही. आपणापासून तर साझे काहीच लपलेले नाही. आपणावर विश्वास ठेवूनच मी माझ्या प्रत्येक तिजोरीतील गुप्त खाण्यात आपला आशीर्वाद फोटो लाविलेला आहे. आपल्या अशीर्वादास्तव उचललेल्या हाताच्या बोटांचीच ती महिमा की तिजोरीतील रोख रक्कम आज पाच पट वाढलेली आहे. खऱ्या अर्थाने तर बाबा, आपणच माझ्या सर्व चल-अचल संपत्तीचे संरक्षणकर्ते आहात. तरीपण हुरहुर लागलेलीच असते. सकाळ–संध्याकाळ तिजोरीतील गुप्त खाणे मी न्याहळूनच घेतो. त्यानिमित्ताने आपल्या फोटोच्या दर्शनाचा लाभ वारंवार घडतच असतो—ही गोष्ट वेगळी.............ऽऽ खरं सांगा बाबा! ऽऽ काही ऽ धा ऽ ऽ ड वगैरे ऽ ऽ तर येणार नाही ना ऽऽऽ ? बाबा! तुम्हास तर माहीतच आहे की माझा काही दुसरा तिसरा धंदा–व्यवसाय नाही. फक्त सावकारीवरच गुजराण होत आहे. त्यावरच सर्वस्व अवलंबित आहे.

" हं ऽऽ काय म्हणालीस ऽ अगं ऽऽ! तुला काही समजते की नाही ? आज रामनवमी. कमीत कमी आज तरी मला मनमोकळेपणाने बाबांची स्तुती करू दे. हे संसारीक गाडं तर नेहमीच चाललेलं आहे......... ... काय म्हणालीस ऽऽ ? त्या गज्जू दलालांना नैवेद्यानिमित्त केलेला शिरा कसा काय द्यायचा ? अगं ऽ! अद्याप

बाबांस नैवेद्य दाखवावयाचा आहे तर काय बिघडलं? पहा! आपले बाबा साधे भोळे-फकिरी बाण्यात बसलेले. मागील नऊ वर्षांपासून तू सारखी शिर्डीची वारी करीत आहेस, परंतु अद्याप बाबांविषयी तू काहीच समजली नाही. अवो, आपले बाबाच तर म्हणून गेले की, त्यांना तुमचे काही-एक नको. फक्त हवे आहे आपले निस्वार्थ प्रेम. प्रत्येक प्राणिमात्रातच त्यांचे वास्तव्य आहे. मग ज्यांच्यावर आपली उपजिविका चालते ते गरजू दलाल तर आपल्यासाठी प्रत्यक्ष श्री साईबाबासारखेच आहेत. बिचारे ऽ ऽ ऽ किती काबाड ऽ – कष्ट ऽ ऽ करतात आपल्यासाठी किती हळहळतात आपली वसुली करण्याकरिता पहिले त्यांनाच दिले तर कुठे काय बिघडले? न जाणे बाबा कोण-कोणत्या रूपाने आपल्या भक्तांस सहाय्य करितात. जा पहिले, त्यांची क्षुधा शांत कर. मग बाबांस लावूच की नैवेद्य. आपले बाबा सगळे काही समजतात. असला सोहळा व षोडषोपचार त्यांना मुळीच आवडत नाही. समजलीस चल जा आता. शांततेनं बाबांची स्तुति देखिल करू देत नाहीत. कालच बजावले होते की आज रामनवमी म्हणून."

"होय बाबा! काय म्हणत होतो बरे? हं ऽ ऽ ऽ–होय, आम्ही फक्त सावकारीवरच अवलंबून आहोत. आतापर्यंत आमची गाडी सुरळीत चालली, ही आपलीच कृपा म्हणायची. नाही बाबा. गेल्या नऊ वर्षांत तर एकूण रुपये नऊशे बहात्तर आपल्या पेटीतच गेले. शिवाय पूर्वी मी अन्नदानानिमित्त निदान एक तरी भिकारी शिर्डीस जेऊ घालायचा. परंतु अलीकडे आपणास तर माहीतच आहे की प्रवास–भाडे किती वाढले ते तर. शिवाय लक्ष्मी तर मुळचीच चंचला. व्यर्थ दुरुपयोग होऊ नये या कारणास्तव अलीकडे मी अन्नदानही बंद केले. अन्नधान्यही महागले व आम्हीही आता वैतागलो. तरीपण कुटुंबातील सर्व आबालवृद्धांना पोटभर जेऊ घालतोच. कालपासून एक मोलकरीणसुद्धा ठेवली. अन्नदानाचे महात्म्य जाणूनच तिस पैका वगैरे न देता एक वेळचे जेवण भरपोट देतो. शिळे, उष्टे सुद्धा फेकत नाही. फेकण्यापेक्षा गरजूना दिले–तर तितकेच पुण्य पदरी पडेल. करिता ते सुद्धा तिलाच देऊन स्वतःस धन्य व कृतार्थ समजतो. यास सुद्धा एक प्रकारचे दानच म्हणायचे नाही......"

"बाबा! काल रात्रीच मी आपल्यावर खर्चीलेला हिशोब पडताळून पाहिला. या निमित्ताने तरी आपले स्मरण वा चिंतन सदैव होतच असते. ही गोष्ट तर अगदी निर्विवाद आहे. पहा बाबा! आज मितीस या पूजासामग्रीस धरून एकंदर चौदाशे एक्याणव रुपये अडूसष्ट पैसे काही एक व्याज व प्रवास भाडे वगैरे न धरता मी आपणावर निस्वार्थीपणे खर्च केलेले आहेत. जर समजा हीच रक्कम मी इतरास उसनी दिली असती तर चौदाशेचे कमीत कमी चौदा हजार निश्चितपणे आठच वर्षांत झाले असते.

आमच्या धंद्याची किमया
तर आपणास माहीतच आहे बाबा
आमच्या जाळ्यात जो सापडतो
त्यास घरदार विकून नागवे
हिंडण्याची पाळी येते. परंतु

आपणाकडे पाहूनच आम्ही कधी मर्यादेचे उल्लंघन करीत नाही. फक्त शोषणाद्वारेच तृप्त होत असतो. इतरांना कर्ज दिलेल्या मुद्दलाचा आम्ही कधी परत मिळण्याचा लोभच करत नाही. फक्त त्यावरील व्याजच आमच्या पदरी पडत असते. यावरून लोक सहायतार्थ भूतदया आम्ही किती दाखवितो हे ठरविण्यास आपणच समर्थ आहात. असो.''

''...होय! शेवटी सांगणे हेच की आतापर्यंत एकंदर नऊ वेळा मी आपल्या दर्शनास्तव शिर्डीस आलो. म्हणूनच मी हा राम-नवमी उत्सव यथोचितपणे निज सदनीच साजरा केला. कांही त्रुटी झाली असल्यास आपण क्षमा करालच.''

'अगं ये सुमन! कापूर वगैरे कुठं ठेवला आहे? काढून दे बरं ऽऽ! पहा, माझी आरती संपली तरी घरातील कुणी एक हजर झाला नाही. अवो हे डाक्तरऽऽसाहेब बिचारेऽ माझी प्रकृती पाहण्यास उभे आहेत. याचा थोडा तरी विचार करा– हंऽऽ! चल दे बरं लवकर आगपेटी वगैरे.'

'बाबा! हा कापूर पेटविला.
पूजा स्विकारावी.
तशी आपली कृपादृष्टी आहेच म्हणायची
आपला मी भार वाहीन सर्वदा,
नव्हे हे अन्यथा वचन माझे'

परंतु साईमाऊली! आपल्याच कृपेने क्षणोक्षणी वाढत असणारा भार अलीकडे जरा स्थिरावलेला आहे.

शेवटी मागणे हेच की
त्वरीत उत्कर्षाचे दिवस येऊ द्या.'

'—अगंऽऽऽ या – सर्वजण या बरं! आरती चिरती घेण्यास. आणि काल आणलेला नारळही आणा. घ्या डाक्तर, आरती-बिर्ती घ्या. का इतके उदास का दिसता? तब्येत-बिब्येत तर ठिक आहे ना! आपली अशीच साधी सॅपल पूजा बुवा. व्यर्थ लयबद्ध तालाने ओरडून व मंत्रोच्चार वगैरे करून आपणास श्री बाबांचे मन मुळीच दुखविता येत नाही. व्यर्थ ओरडण्यात काहीच हाशील नाही. 'मनी नाही भाव अन् देवा मला

गाव ' असलाच तो प्रकार. जे काही म्हणायचे ते अगदी साध्या सरळ शब्दात म्हणण्यास कसली लाज ? '

" घ्या आर्ती सर्वजण घ्या बरं ! नैवेद्य दाखविण्यास प्रसादाचे ताट पण आण. गज्जूस दिला की नाही ? बसा म्हणा. येतो आता. जरा नारळ फोडू द्या. दगड दे बरं ऽऽऽ—अरेच्या ! हा तर सडका निघाला.

स्वाहा झाला.
बाबांना पावला.
म्हणूनच सडका निघाला.
अरे ! काय झाले ? कसला हा गोंगाट ?
इतकी आरडा–ओरड कशाला ?
काय ?

गज्जू दलालांनी आत्ताच दिलेले नऊशे रुपये गहाळ झाले म्हणता ! काही चेड-बिड तर लागलं नाही ? घरच्या घरी कुठे जाणार ?

कुठं ठेविले होते ?
आलमारीवर !
आणि ती शेंबडी मोलकरीणही फरार
झाली म्हणता ऽ ऽ ऽ—
तिनेच चोरले असावेत.
अरे !
धावा, धावा,
अं ऽ ऽ ! तिचं घरदारही माहीत
नाही म्हणता !
काय जमाना आला ऽ ऽ ऽ
जेवावयास मिळत नाही
म्हणून कालच ती
दारावर आली.
समर्थांनीच उपदेशिल्याप्रमाणे
मी गरीबावर दया दाखविली.
एक वेळचे जेवण दिले.
आणि तीच आता गायब झाली म्हणता ?
तेही व्याजाचे नऊशे रुपये घेऊन

फरार झाली !

अरे बावळट कुठले

सर्व माझे तोंडाकडे का पाहता ?

जा ऽऽ जा ऽ

चौकशी करा, शोधा तिला

ठाण्यात रिपोर्ट द्या ऽ.

नाही नाही थांबा ऽऽऽऽ

ठाण्यात बिण्यात जाऊ नका.

ती तर

व्याजाची नंबर दोनची रक्कम. खात्यात नोंदणी वगैरे काहीच नाही. व्यर्थच वाद उठायचा व धाड यायची.

मेलो ऽऽ बाबा ऽऽऽ धा ऽ व ऽऽऽ सा ऽ ई ऽ बा ऽ बा ऽऽऽ धा ऽ... ''

असे म्हणत म्हणतच शेठजी कलंडले. बेशुद्ध झाले. मी सुद्धा आपल्या पेशास अनुसरून त्यांची नाडी वगैरे धरली व देव्हाऱ्यातील श्री बाबांच्या मूर्तीकडे न्याहाळीत विचार करू लागलो...बरोबरच आहे... " जया मनी जैसा भाव।

तया तैसा अनुभव ॥... "

...शेठजीचे भाग्य फुटले.

नारळ सडका निघाला.

# श्रीसाई महिमामृत – प्रसिद्धी आणि प्रचिती

लेखक : **मधुकर भीमाशंकर देशपांडे,**
**बी. ए. (ऑ.)**
३३, कसबापेठ, पुणे-११.

● सन १९६० सालची गोष्ट. मी नेहमीप्रमाणे सायकलवरून पुण्यातील अरण्येश्वरला जात होतो. जाताना स्वारगेट रस्त्यावरील श्री साईबाबांचे मंदिर लागते. त्या मंदिरात त्यावेळी दुपारची आरती चाललेली असे. श्रीसाईंच्या मंदिरात प्रथम गेलो तर आरती पूर्ण होईपर्यंत थांबावयास हवे आणि त्यात अर्धा तास जाणार. तेवढ्या वेळात अरण्येश्वरी जाऊन दर्शन घेऊन परत साईमंदिरी माघारी येऊ असा विचार मनात

डोकावून गेला. परंतु हा विचार क्षणभरच राहिला कारण श्रीसाईमंदिरासमोरच माझी सायकल बर्स्ट झाली आणि श्री साईमंदिरात प्रथम जाणे मला भाग पडले. आपणास श्रीसाईबाबांनी मुद्दाम बोलावून घेतलेले आहे ही, भावना माझ्या मनात त्यावेळी आली नाही. त्यानंतर लागोपाठ तीन वेळा जेव्हा त्याच ठिकाणी माझी सायकल या ना त्या कारणाने नादुरुस्त झाली त्यावेळी मात्र माझ्या मनात असा विचार आला की आपण या मंदिरात दर्शन घेण्याचे टाळून अरण्येश्वरी जात आहोत हे काही बरोबर करीत नाही माझेकडेच प्रथम ये हे त्यावेळी बाबांना मला सुचवावयाचे होते. मेघाला श्रीसाई शंकराच्या रूपातच दिसले. साई आणि श्री शंकर हे भिन्न नाहीत याची प्रचिती मला त्यावेळी आली. त्या दिवशी बाबांचे नम्रपणे दर्शन घेतले आणि वाङ्मयीन काहीतरी सेवा करीन असा त्यांचेसमोर उभा राहून मनाशी निश्चय केला, आणि लवकरच श्रीसाई महिमामृताचा पहिला अध्याय मी लिहिला. परंतु या गोष्टीला १४ वर्षे होत आली तरी दुसरा अध्याय लिहून झाला नाही. बाबांच्या दर्शनाचा लाभ होत होता, पोथी लिहिण्याचा मनाचा निश्चय चालला होता, परंतु कृतीत मात्र काहीच घडत नव्हते. शेवटी एक दिवस मीच वैतागाने बाबांचे समोर उभा राहिलो आणि मनोभावे त्यांना म्हणालो, 'बाबा आपली पोथी पूर्ण करण्याचा माझा निश्चय आहे. परंतु नोकरीमुळे मला पुरेसा वेळही मिळत नाही आणि त्यामुळे माझे इप्सित साध्य होत नाही. तेव्हा तुम्हीच काहीतरी योजना करून मला वेळ मिळवून द्या आणि माझे हातून सेवा करवून घ्या.'

थोड्याच दिवसात मी ज्या आर्यभूषण प्रेसमध्ये कामाला होतो तो बंद पडला आणि माझे कार्य करण्यास मला अवधि मिळाला. पोथी पूर्ण केल्याशिवाय नोकरीच्या मागे लागावयाचे नाही आणि मनासारखी नोकरी मिळाल्याशिवाय आणि ती घरी चालून आल्याशिवाय करावयाची नाही असा मनाचा निश्चय केला. माझा या निश्चयाने घरातील लोकांना चमत्कारिक वाटले, थोडासा विरोधही झाला पण ते पेल्यातील वादळ कालांतराने शांत झाले. सतत दोन–अडीच महिने मनन करून मी माझी पोथी –श्रीसाईमहिमामृत–शके १८९६ मध्ये नागपंचमीच्या सुमुहूर्तावर पूर्ण केली. त्यावेळी कार्यपूर्तीचा आनंद शब्दातीत आहे. बाबांनी माझे हातून एक मोठे सत्कृत्य करून घेतले याची सुखद जाणीव माझे मनाला प्रफुल्लित करीत होती.

श्रीसाईमहिमामृत पोथीची हस्तलिखित प्रत घेऊन मी शिर्डीला गेलो आणि बाबांच्या चरणी ती ठेवली. पोथीतील असणारे माझे सारे दोष बाबांनी नाहीसे करावेत हीच त्यावेळी मी प्रार्थना केली आणि पोथी घेऊन मोठ्या भक्तिभावाने गुरुपादुकास्थानापाशी पहिल्या अध्यायाचे वाचन केले. पुण्यास आल्यावर दररोज एक अध्याय याप्रमाणे २१ अध्याय वाचले, व पारायण पूर्ण केले. शेवटच्या दिवशी मी माझ्या सौभाग्यवतीला बोलावले आणि म्हणालो, 'आज या पोथीचे पारायण पूर्ण झालले

आहे आणि आज काहीतरी विशेष घडावे अशी माझी धारणा आहे! आणि मोठ्या आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्या दिवशी संध्याकाळपर्यंत मला माझे घरी तीन ठिकाणच्या नोकरीचे आमंत्रण चालत आले. झाल्या प्रकाराने मी खरोखर चकीत होऊन गेलो. माझ्या बोलण्याची प्रचिती आलेली पाहून सौभाग्यवतीलाही हायसे वाटले, आणि लवकरच मी पुणे येथील विशाल सह्याद्रिच्या जॉब-विभागाचा व्यवस्थापक म्हणून काम पाहू लागलो.

श्रीसाईकृपेमुळेच हे सर्व घडत आहे याची पूर्ण जाणीव झाल्यामुळे माझी विवंचना घालविणाऱ्या श्रीसाईनी इतरांचीही घालवावी यासाठी श्रीसाईमहिमामृताची पोथी प्रकाशित करावी असा संकल्प केला; आणि कार्यास आरंभ केला. त्या पोथीचे छपाईस प्रत्येक गोष्टीत अनपेक्षितपणे भरपूर सहाय्य मिळत गेले आणि थोड्याच अवधीत पोथी प्रकाशित झाली.

हा सारा इतिहास एकाद्या चलत्चित्रपटाप्रमाणे माझे मनःचक्षुंपुढे जेव्हा उभा राहतो तेव्हा माझे डोळे अक्षरशः पाण्याने भरून येतात, कंठ दाटून येतो आणि बाबांच्या अगाध लीलेचे कौतुक वाटून हात जोडले जातात. ●

# श्री बाबांनी अरिष्ट स्वतःवर घेतले!

– डॉ. श्या. शं. तेंडुलकर,
नवी ७१०, सदाशिव पेठ, पुणे ३०

● दि. ८-९-७६ ची गोष्ट! सकाळी अकस्मात धक्का लागल्याचे निमित्त होऊन दर्शनी असलेला श्रीसाईबाबांचा मोठा आशीर्वाद फोटो खाली पडला व त्याची काच भंगली. ताबडतोब काच पुनः बसवून आणण्यात आली. पण झालेली गोष्ट सर्वांच्या मनाला लागून राहिली.

नंतर माझ्या नित्याच्या पूजाकाळी अशा काही संकटसूचक घटना घडल्याच, पण करुणा भाकण्यापलिकडे आमच्या आधीन काहीच नव्हते.

आणि याचा प्रत्यय लगेच आला. दुपारी १२ च्या सुमारास माझा मोठा मुलगा स्कूटरवरून जवळच्या गावी व्हिजिटला जात होता. वाटेत नदीवरील पुलाचा रस्ता पावसाने उखडलेला होता. जपून जात असताही त्याची स्कूटर उजव्या बाजूस कलंडली. जवळपास कोणी नाही. डाव्या बाजूस पाय ठेवावयाससुद्धा जागा नाही. अशा वेळी प्रसंगा-

वधान राखून तो सुखरूप उठला. जर स्कूटर डाव्या बाजूला कलंडती तर दहा फूट उंची-वरून नदीच्या वाहत्या पाण्यात स्कूटरसह पडण्याचा जीवावरचा प्रसंग होता. पण त्या प्रसंगाची चुणुक दाखवून श्रीबाबांनी आरंभीच्या घटनेत तो स्वतःवर ओढवून घेतला व माझ्या मुलाचे व पर्यायाने आमचे सर्वांचे अरिष्ट टाळले अशीच आमची भावना झाली, व श्रीबाबांच्या चरणी कृतज्ञतापूर्वक मस्तक विनम्र झाले.

श्रीसाईसच्चरित्रातील प्लेग झालेल्या मुलाच्या गाठी स्वतःवर ओढवून घेतलेल्या कथानकासारखी ही घटना घडली ! धन्य ती साई माऊली ! ●

# दीड लाखाचा दंड सुटला !

**श्री. डी. आर. खडके,**
सेवानिवृत्त कमिशनर, सेंट्रल सी.आय.डी., "सहवास",
चेंबुर, मुंबई.

● मी आज जो अनुभव सांगणार आहे तो साधारण १८/२० वर्षापूर्वीचा आहे. हा अनुभव माझे जुने आणि निकटचे परम मित्र श्री. हातिमभाई वहानवटी या बोहरी जातीतील अतिशय सधन कुटुंबातील गृहस्थाविषयींचा आहे.

अनुभव लिहिण्यास माझी पुतणी कु. प्रतिभा खडके ही बरेच दिवसांनी अचानक आल्यामुळे लेखनिक म्हणून तिचा मला उपयोग होत आहे. हा पण एक सुयोगच समजायचा. गेल्या २५ वर्षात ऑफीसमध्ये लेखनिक (स्टेनोग्राफर) हाताखाली असल्यामुळे हातांनी लिहिण्याची माझी सवय जवळजवळ मोडलीच आहे.

माझे वडील व आई ही दोघेही श्रीसाईबाबा हयात असल्यापासून त्यांची निस्सिम भक्त होती, आणि ती दोघेही श्रीबाबांच्या सान्निध्यात शिर्डीला वर्षातून १/२ महिने जाऊन रहात असत. त्या भावना लक्षात ठेवून माझे वडील जरी माझ्या लहानपणीच वारले तरी वृद्ध आईंना बरोबर घेऊन मी वर्षातून चार-पाच दिवस शिर्डीला जात असे, आणि ही श्रीबाबांच्या विष-यीच्या भक्तिची जाणीव श्री. हातिमभाई यांना होतीच.

श्री. हातिमभाई जरी माझे जुने आणि परममित्र आहेत तरी ती मैत्री पूर्ण निस्वार्थी आणि कोणच्याही प्रकारचा एकमेकांपासून फायदा उठविण्याच्या पायावर उभी नसलेली अशी आहे. त्यामुळे व्यक्तिगत अडचणींविषयी आम्ही

एकमेकाशी कधीही चर्चा न करण्याचा प्रघात आहे. अशा ह्या पार्श्वभूमीवर वर लिहिल्याप्रमाणे सुमारे अठरा-वीस वर्षांपूर्वी मला एके दिवशी विचारले की, मुंबई कस्टममध्ये तुझ्या ओळखीचे कोणी आहेत काय ? कस्टममध्ये तुमचे काय काम आहे असे विचारता ते म्हणाले की, "मी सुमारे पाच-सहा महिन्यांपूर्वी काही मशिनरी आयात केली आहे, पण ही आयात कायद्याच्या चौकटीबाहेर आहे असे कस्टम अधिकाऱ्यांचे म्हणणे असून, गेले सहा महिने मी ही आयात कशी संपूर्णतया कायदेशीर आहे हे पटवून देण्याचा प्रयत्न केला तरी ते कोणीही ऐकण्यास तयार नाहीत, आणि मध्यंतरीच्या काळात ती मशिनरी मुंबई बंदरातील कस्टमच्या गोदामात पडून असल्यामुळे गोदामाचा आकार (डिमरेज चार्जेस) आणि दंड म्हणून कस्टम अधिकाऱ्यांनी माझ्याकडून जवळ जवळ दिड लाख रुपयांच्या वर मागणी केली आहे.

माझी अजून पूर्ण खात्री आहे की मी आयात केलेली मशिनरी पूर्ण कायदेशीर आहे वगैरे वगैरे." त्यांच्या वरील वक्तव्यावरून हे उघड दिसत होते की त्यांनी कस्टम खात्यात सर्व थरावर आपल्यापरीने प्रयत्नांची पराकाष्ठा केली होती पण ती सर्व निष्फळ ठरली होती.

मी खरा विचार केला पण कस्टम खात्यात अशा परिस्थितीत कोणी मदत करू शकेल असे कोणीही माझ्या ओळखीचे नव्हते. मी काही वर्षांपूर्वी ऐकले होते की, कस्टममध्ये श्री XXX नावाचे गृहस्थ असिस्टंट कलेक्टर या हुद्यावरती होते. त्यांच्या बंधूंचा आणि माझा काही वर्षांपूर्वी नाममात्र संबंध आला होता. हे बंधू परळला एका सरकारी संस्थेत कामासाठी होते. श्री. हातिमभाई यांना मी सांगितले की, त्यांना मदत करू शकेल असे कस्टम खात्यात कोणी ओळखीदेखीचे नाही. पण वर उल्लेखिलेल्या परळला असणाऱ्या बंधूंना पाहिजे असल्यास मी चिठ्ठी देऊ शकतो आणि त्यांच्या तर्फे काही काम होत असल्यास बघावे. हा एक चान्स घेणे एवढाच मार्ग होता, आणि त्यात काही फारसा पण दम नाही याची मला पण कल्पना होती. हातिमभाई यांनी मला अतिशय आग्रह केला की मी त्यांचेबरोबर परळच्या बंधूंकडे यावे आणि त्यांना सर्व स्थिती व्यवस्थितपणे सांगावी. मी त्यांना सांगितले की, त्या परळच्या बंधूंचा माझा, मी त्यांच्याकडे प्रत्यक्ष जाण्याइतका संबंध नाही. याकरिता उपयोग झाला तर माझ्या नावाचा व चिठ्ठीचा होईल. माझ्या प्रत्यक्ष जाण्याने काहीही उपयोग होणार नाही. माझ्या मित्राला माझे म्हणणे पटले नाही आणि मी टाळाटाळ करीत आहे अशी त्यांची भावना होऊ लागली. त्यांना मी सांगितले तुम्ही श्रीसाईबाबांचे नाव घ्या आणि माझी चिठ्ठी घेऊन परळच्या बंधूंकडे जा आणि यदाकदाचित श्रीसाईबाबांच्या कृपेने तुमचे काम झाले तर पुढील खेपेस मी जेव्हा माझ्या आईना घेऊन शिर्डीला जाईन त्यावेळी त्यांनी

आमच्याबरोबर येऊन बाबांच्या समाधीवर चादर घालावी. श्री. हातिमभाई शिर्डीला येण्यास तावडतोब तयार झाले. परंतु परळला ते एकटे जाण्यास शेवटी नाखुषीने व नाईलाजास्तव तयार झाले. मी परळच्या बंधूंना चार ओळींची त्रोटक चिठ्ठी लिहीली की, ही चिठ्ठी घेऊन येणारे श्री. हातिमभाई माझे खास मित्र आहेत. त्यांना कस्टम खात्यात थोडीशी न्याय्य मदतीची जरुरी आहे. त्या बाबतीत आपणास काही करता येणार असल्यास पहावे. माझी ही अशी चिठ्ठी त्या बंधूने पाहताच श्री. हातिमभाई यांना त्यांनी अतिशय आदराने बसविले आणि प्राथमिक थोडीशी विचारपूस करून त्यांनी ताबडतोब कस्टम खात्यात आपल्या बंधूना टेलिफोन केला आणि श्री. खडकेसाहेब यांच्या खास मित्रास मी तुमच्याकडे पाठवित आहे तर त्यांचे म्हणणे तुम्ही ऐकून घ्यावे आणि शक्य असेल ती कायदेशीर मदत करावी. कस्टममधील बंधूंनी श्री. हातिमभाई यांना ताबडतोब त्यांच्याकडे पाठवून देण्यास सांगितले. त्याप्रमाणे श्री. हातिमभाई गाडीतून कस्टम ऑफिसमध्ये पोहोचले. तेथील वर निर्देशिलेल्या श्री ××× या असिस्टंट कलेक्टरनी त्यांचे अदबीने स्वागत केले. श्री. हातिमभाईनी आपली केस त्यांना थोडक्यात समजावून सांगितली आणि त्या संबधीचे कागदपत्र पण त्यांना दाखविले. असिस्टंट कलेक्टरनी सर्व कागदपत्र बघितले आणि सांगितले की तुमची केस पूर्ण कायदेशीर आहे त्यांनी ताबडतोब त्यांच्या हाताखालील संबंधीत अधिकाऱ्यांना केस संबधीचे कागदपत्र घेऊन येण्यास पाचारण केले आणि श्री. हातिमभाई यांची केस पूर्ण कायदेशीर आणि ताबडतोब असताना देखील त्यांना इतके महिने त्रास दिल्याबद्दल त्यांची कानउघडणी केली. त्यांनी निकाल दिला की श्री. हातिमभाई यांनी आयात केलेला माल ताबडतोब मोकळा करावा आणि श्री. हातीमभाईंना त्रास दिल्याबद्दल अधिकाऱ्यावर दोषारोप ठेवला. हा सर्व प्रकार अर्ध्या पाऊण तासात संपला. श्री. हातिमभाई थक्कच झाले आणि तडक ते माझ्याकडे येऊन सद्‌गदित अंतःकरणाने झालेला प्रकार मला सांगू लागले आणि माझ्या नावाचा आणि पत्राचा केवढा महिमा आहे यांचे वर्णन करू लागले : मी त्यांना सांगितले हा सर्व श्रीसाईबाबांच्या महिम्याचा प्रभाव आहे.

त्यानंतर नेहमीप्रमाणे माझ्या आईला घेऊन मी शिर्डीला गेलो. त्या वर्षी श्री. हातीमभाई आमच्याबरोबर शिर्डीला आले व श्रीबाबांच्या पुढे नतमस्तक झाले हे सांगायची जरुरी नाहीच.

# नवसास माझी पावेल समाधि....!

— श्री. चंद्रकांत दामोदर सामंत
डोंगरे मॅनशन, ताडदेव रोड, मुं. ७

● दि. १४ फेब्रुवारी १९७६ ला शिरडी येथे लेखक-कवींच्या दुसऱ्या वार्षिक संमेलनाला मी गेलो होतो, तेव्हा समाधिमंदिरात उभा असताना सहज मनात विचार आला की माझा मुलगा चि. यतीन हा जर एस. एस. सी. परीक्षेत चमकला तर शिरडी येथे एका गुरुवारी दुपारच्या आरतीनंतर प्रसाद म्हणून पेढे वाटीन. त्यानंतर २१ फेब्रुवारीला डॉ. आण्णासाहेब गव्हाणकर, श्री. सदानंद चेंदवणकर व त्यांचा मुलगा चि. सुभाष ह्यांच्यासह सुरतचे श्रीसाई मंदिर बघण्यास गेलो होतो. तेथील व्यवस्थापकांनी आमची सर्व व्यवस्था उत्तम प्रकारे ठेवली होती. इतकेच नव्हे तर दुसऱ्या दिवशी सुरतच्या आसपासची काही स्थळे पाहण्यासाठी मोटारचीही सोय केली होती. त्यावेळी तेथील प्रसिद्ध श्रीअंबामातेचे देऊळ पाहण्यास आम्ही गेलो. देवीच्यासमोर ध्यानस्थ असता डॉ. गव्हाणकरांना देवीने दृष्टांत दिला की चि. यतीन परीक्षेत खचित चमकणार. वास्तविक पाहता, ह्या बाबतीत माझे व डॉक्टरसाहेबांचे ह्यापूर्वी काहीच बोलणे झाले नव्हते. पुढे दि. २३ जून रोजी परीक्षेचा निकाल लागून सर्व विद्यार्थ्यांत यतीन सोळावा आला. त्याने केलेल्या परिश्रमांना यश आले व माझ्या मनोमन केलेल्या प्रार्थनेला श्रीबाबांनी प्रतिसाद दिला. आधी बोलल्याप्रमाणे आम्ही गुरुवार दि. ८ जुलै (आषाढी एकादशी) ह्या दिवशी शिरडीस यतीनच्या हस्ते अभिषेक, समाधीला वस्त्रे, सत्यनारायण व आरतीनंतर उपस्थितांना पेढे वाटणे हे विधी कृतज्ञतापूर्वक पार पाडले. ●

# भक्तास आलेला स्वानुभव

— श्री. डी. बी. पोतनीस
२६/७, एच. बी. पिंपरी, पुणे.

● मला श्रीसाईबाबांचे प्रथम दर्शन सन १९३८ मध्ये पुणे येथील सदाशिव पेठेत राहणारे श्री. फडके यांचे घरी आरतीचे वेळी झाले. जवळजवळ आज ३८ वर्षे मी श्री साई कृपाछत्राखाली असून अनेक संकटातून मुक्त झालेलो आहे. माझे श्री साई बाबांचेबद्दल स्वानुभव यापूर्वी श्री साईलीला मासिकातून प्रसिद्ध झाले आहेत. मला आलेला ताजा अनुभव मी श्रीसाईलीला वाचकांना सादर करीत आहे.

मी सरकारी नोकरीतून सेवानिवृत्त लौकरच होणार, तेव्हा निदान चारपाच पवित्र तीर्थस्थाने पाहून घ्यावीत हीच मनापासून इच्छा होती. परंतु हे सर्व पैशाचे शिवाय शक्य नव्हते. मन अगदी बैचेन होते. गुरुवार ता. ६ मे १९७६ रोजी नित्य नियमानुसार सकाळी ६–३० वाजता श्रीसाई पूजा आटोपून आरतीसाठी तबक हातात घेऊन उभा राहिलो. माझ्या कुटुंबातील सर्व आरतीसाठी उभे राहिले. आरतीची सुरुवात झाली. काही वेळानंतर काय चालले आहे याचे मला भान राहीले नाही.

"तव महिमा किती वर्णावा । मज शक्ती नसे बा देवा
हे जाणूनी या महाराज । कृपा करी आज"

एवढेच शब्द बाहेर पडले तोच साईबाबांचे फोटोवरील फूल टपकन खाली पडले. माझे दोन्ही डोळ्यातून अश्रू वाहत होते. मी सावध झालो आणी पाहतो तर माझे पत्नीने व मुलांनी मला धरुन ठेवलेले. हा काय प्रकार आहे मलाच समजेना. आरती तीर्थप्रसाद झाला. मला गुरुवारचा उपवास म्हणून मी फक्त चहा घेऊन ऑफिसमध्ये गेलो. माझे सहकारी मंडळींनी ऑफिसमध्ये दर गुरुवारी श्री दत्ताची पूजा चालू केली आहे, त्य नियमानुसार आजही ११ वाजता पूजा झाली, प्रसाद वाटून झाला आणि मंडळी कामास लागली. माझे मन कामाकडे लागेना. काही वेळ जातो न जातो तोच माझा एक सहकारी मला म्हणाला की, मी तिरूपतिला जाणार आहे म्हणून आजच मी L.T.C. ॲडव्हान्स साठी अर्ज देत आहे. मी एकदम स्वप्नातून जागा झालो. माझे मन आनंद सागरात नाचू लागले. माझाही विचार L.T.C. ॲडव्हान्ससाठी ठरला आणि लगेच माझी रिक्विझिशन ऑफिसकडे पाठविली. आणि नाटकाचा पडदा उघडावा त्या प्रमाणे मला रु. ५००।– सोमवार तारीख १०।५।७६ रोजी मिळाले. मी, माझी पत्नी आणि दोन मुलगे यांचेसह बुधवार तारीख १२।५।७६ रोजी प्रथम शिर्डी दर्शना-साठी निघालो. का आणि कसे काय झाले हेच न समजता दुपारी बारा वाजताच्या S.T. ने प्रथम पंढरपुरला रात्री १० वाजता पोहचलो. गुरुवारी १३।५।७६ रोजी चंद्रग्रहणा निमित्त चंद्रभागेत स्नान करून श्री विठ्ठलाचे दर्शन घडले. तुळजापूर, गाणगापूर, अक्कलकोट ही पवित्र तीर्थस्थाने पाहून मंगळवार तारीख १८।५।७६ रोजी रात्री १० वाजता शिरडीस आलो. त्यावेळी श्रीबाबांची शेजारती चालू होती. नेत्र भरुन श्री बाबांचे दर्शन झाले आणि गुरुवार तारीख २०।५।७६ रोजी दुपारी श्री बाबांचा प्रसाद घेऊन दुपारी दोन वाजताचे S.T. ने पुणे येथे सुखरुप पोहचलो. प्रवासात कोणताही त्रास झाला नाही. ही श्रीसाई कृपाच आहे. फक्त आठच दिवसात आमचे सर्वांचे मनोरथ पूर्ण झाले.

"श्री बाबांचे रूपे आले शिरडी मध्ये भगवान रे
शरण जाऊनी चरण धरी अन् साधुनी घे कल्याण रे"

# श्रीसाईकृपेने व्यसन सुटले

**सूर्यकांत मा. गर्जे.**
८०, शिवाजीनगर, पुणे-३०.

● श्री. खंडागळे, माझे अलीकडील एक परम स्नेही. तशी त्यांची व माझी पाच वर्षांपूर्वी राजस्थानमधील अजमेर येथे भेट झाली होती. परंतु तिचे रूपांतर मैत्रीत होऊ शकले नाही. औपचारिक ओळख असेच फार तर म्हणावे लागेल. परंतु अलिकडे का कोण जाणे, स्नेहाच्या बंधनात आम्ही बद्ध झालो आहोत आणि त्याचे कारण आम्ही दोघांनी अनुसरलेली श्री बाबांची आराधना !

श्री. खंडागळे एक निष्णात इंजिनियर असून पुण्यातील एका सरकारी कचेरीत उच्च पदावर आहेत. पुण्यातील शिवाजीनगर भागातील श्रीसाईनाथ मंदिरात दर गुरुवारी नियमितपणे येणाऱ्या अनेक भक्तांपैकी श्री. खंडागळे एक होत. श्री बाबांच्या-बद्दल त्यांच्या मनात असलेली निर्व्याज भक्ति व नितांत श्रद्धा पाहून मनाला प्रेमाचे पाझर फुटतात.

एका गुरुवारी श्री. खंडागळे मंदिरात श्रीबाबांच्या आरतीला आले होते. आरती झाली. तीर्थ-प्रसाद वाटण्यात आला. 'देवाचिये द्वारी, उभा क्षण भरी।' या उक्ती-प्रमाणे प्रत्येक भक्त क्षणभर थांबे. श्रीबाबांच्यासमोर मांडी घालून बसे, सच्चिदानंद सद्‌गुरु श्री बाबांना मनोभावे नमस्कार करून मग मंदिरातून बाहेर पडे.

मंदिरातील एका कोपऱ्यात उभे राहून श्री. खंडागळे यांनी मला हाक मारली म्हणून मी त्यांच्याजवळ गेलो. त्यांना पाहून मला खूप आनंद झाला. गेल्या गुरुवारी श्री. खंडागळे आरतीला आले नव्हते. त्यांची अनुपस्थिती मला जाणवली होती. त्यांच्या नियमितपणात का खंड पडला याचे मला कुतूहल माझ्या मनात होतेच; म्हणून मीच प्रश्न केला.

'गेल्या गुरुवारी आपण आला नाहीत ?'

'तेच तर सांगण्यासाठी तुम्हाला हाक मारली' असं बोलून श्री. खंडागळे बोलू लागले—

'गेल्या गुरुवारी मी दिवसभर घरात झोपूनच होतो. अंगात फणफणून ताप भरला होता. घरातील सर्व मंडळी गावाला गेल्यामुळे घरात मी एकटाच होतो. तापामुळे

कनालीचा अशक्तपणा आला होता. तोंडाला चव ती कशी मुळी नव्हतीच. त्यामुळे दिवस-भर काही खाल्लेच नाही. संध्याकाळचे सात वाजले होते. आमच्या घरासमोर डॉक्टर आलेत. ते आल्याचे खिडकीतून पाहिले आणि कपडे करून कसाबसा त्यांच्या दवाखान्यात गेलो. डॉक्टरांनी अंगाला हात लावला आणि त्यांना चटकाच बसला. माझ्या डोळ्यापुढे अंधेरी आली आणि मला एकदम बाबांच्या आरतीची आठवण झाली. श्रीबाबांची प्रतिमा डोळ्यापुढे तरळू लागली. आरतीचे सुस्वर आणि घंटा-नाद कानात घुमू लागला आणि एकदम आवाज आला—

'सिगरेट ओढू नका!'

डोळे उघडले तेव्हा समोर डॉक्टर उभे होते. एक इंजेक्शन घेतले. औषध घेतले आणि घरी आलो.

श्री. खंडागळे पुढे सांगू लागले, 'गर्जे, तुम्हाला कल्पना नाही, मी चेन स्मोकर होतो. दिवसाला दोन पाकीटे मला लागायची. हे व्यसन बरे नव्हे हे पटायचे, पण सुटत नव्हते. खूप वेळा प्रयत्न केला पण तो व्यर्थ गेला. एकदा याच मंदिरात श्री बाबांना प्रार्थना केली, 'बाबा, सोडवा या व्यसनातून लवकर' आणि बाबांनी माझी प्रार्थना ऐकली.

गेल्या गुरुवारी मला ताप येतो काय, मी दवाखान्यात जातो काय, आरतीची आठवण येवून बाबांची मूर्ति डोळ्यापुढे येते काय आणि 'सिगरेट ओढू नका' हे शब्द कानावर पडतात काय. तो डॉक्टरांचा आवाज, छे! श्रीबाबांचाच तो आवाज होता. सारेच आश्चर्य!

पंचवीस वर्षांचे व्यसन इतक्या चुटकीसरशी सुटावे यात श्रीबाबांचीच कृपा म्हणावी लागेल. सिगरेटचे व्यसन सुटावे म्हणून हा सर्व खेळ बाबांनीच रचला व त्यातून मला सोडवले. मुलाचे हाकेला 'ओ' देणारी आई म्हणजेच आपले श्रीसाईबाबा होत.

नकळत श्रीबाबांच्या मूर्तीपुढे आम्ही दोघेही नतमस्तक झालो, भारावलेल्या मनाने, ओथंबलेल्या श्रद्धेने!

●

# वडिलांचा पाय साफ बरा झाला

— कु. पुष्पलता मोहरे
बड़े पोस्ट आफिस के पास
राजेन्द्र नगर, बिलासपुर [ म. प्र. ]

● काही वर्षांपूर्वी घडलेली सत्य घटना ! माझ्या वडिलांच्या उजव्या पायावर खाज सुरू झाली व पुढे त्याचे प्रमाण वाढून तिने 'एक्झीमा' चे रूप घेतले हे कळताच वडिलांनी डॉक्टरचे औषध सुरू केले. पण बरेच दिवस औषध घेऊनसुद्धा कोणतेच औषध किंवा मलम त्यावर लागू झाले नाही. हळुहळु त्याचे प्रमाण वाढू लागले. त्या जागी पू भरून पायाला ठणका बसत, व त्यामुळे अंगात ताप पण राही, ह्या त्रासानी वडिलांना घरातल्या घरात चालणे पण कठीण झाले. पाहणारे लोक बोलू लागले. अहो एक्झीमा मुळी कधी न बरा होणाराच रोग. त्याला डॉक्टरी इलाज नाही. कोणी म्हणे पायाचे ऑप्रेशन करून तितका भाग काढावा लागेल, कारण तितका पायच सडला आहे. हे सर्व ऐकुन माझ्या आईचे मन फारच घाबरले. सर्व उपाय करून आई-वडील थकले होते. शेवट उपाय म्हणून आईने श्रीसाईबाबांना साकडे घातले व पाय बरा झाला तर तुझ्या दर्शनाला येईन व खडावा अर्पण करीन असा नवस केला. ती रोज बाबांना मनोभावे आळवू लागली.

खरी प्रार्थना कधीच वाया जात नाही म्हणतात तेच खरे झाले व बाबा त्वरित धावून आले. वडील सर्वांना पाय दाखवून दाखवून अक्षरशः कंटाळले होते. पायावर माशा बसतात म्हणून ते नेहमी पाय फडक्यानी गुंडाळून ठेवीत. असेच एक दिवस ते दारात खुर्चीवर बसले होते. इतक्यात सडकेवरून एक माणूस अंगात कफनी व डोक्याला फडके बांधलेला कुठे न जाता सरळ आमच्या घरीच आला व पायाला काय झाले म्हणून वडिलांना विचारू लागला. वडिलांनी टाळण्याचा प्रयत्न केला पण तो पाय दाखविण्याचा आग्रह करू लागला वडीलांनी म्हटले इतके डॉक्टर झाले आता तू काय इलाज करणार ? शेवटी हो नाही करता करता त्याला पाय दाखविला. पाय पाहून तो म्हणाला तुमच्या पायात पू भरला आहे. मी त्या जागी पुंगळी लावून तोंडानी पू ओढून काढीन. तुम्ही मला काय द्याल ?

मग एका पुंगळीचे चार आणे हा भाव ठरवून त्याने साठलेल्या जागी पुंगळी लाऊन तोंडाने पू ओढून काढला. ह्या प्रमाणे जवळ जवळ ४० पुंगळ्या झाल्या. नंतर काहीतरी औषध लावले व लिंबू उतरवून टाकले व सांगितले काळजी करू नको

आता तुझा पाय बरा होईल. वडिलांनी त्याला हिशोब करून पैसे दिले. तो निघून गेला. आई आतून सर्व प्रकार पाहत होती. पण तेव्हा तिच्या लक्षातही नव्हते की बाबांना आपण नवस केला आहे.

तो इसम गेल्यानंतर मात्र आईच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला व ती म्हणू लागली, एवढे तोंडानी पू काढण्याचे धाडस कोण बरे करेल. मी बाबांना प्रार्थना केली होती तेच ह्या रूपानी आले असावेत असे मला वाटते आणि खरोखरच वडिलांना पाय फार हलका वाटू लागला व आता आपला पाय नक्कीच बरा होणार अशी त्यांना खात्री वाटू लागली. लगेच वडिलांनी ३-४ माणसांना बोलावून सायकलवरुन त्या व्यक्तीचा शोध करण्यासाठी पाठविले. पण ती व्यक्ति कुठेच सापडली नाही. त्यानंतर वडिलांचा पाय हळुहळू बरा झाला. लोकांना आश्चर्य वाटले की पाय बरा कसा झाला ? बोलल्याप्रमाणे आई-वडील शिरडीला दर्शनाला जाऊन नवस फेडून आले.

कृपाळू साईमाऊलीच्या चरणी माझे शत शत प्रणाम ●

## —साईकृपा—

—सौ. कमल रघुनाथ सांडभोर
५७० दत्तवाडी, पुणे नं. ३०

● साईबाबांची आमच्या घरात सर्वजण पूजा करतात. दर गुरूवारी आरती होते. माझे पती रघुनाथ सांडभोर हे नित्य नेमाने तिन्ही उत्सवास शिरडीस जातात, व सेवा करतात. त्यामुळे आम्हांला अधून मधून शिरडीला जाण्याचा योग येतो. साईबाबांचे दर्शन घडते.

साईबाबांची नित्य नेमाने मी पूजा व आरती करते. त्यात शक्य तो खंड पडू देत नाही. माझ्या रोजच्या जीवनात साईबाबांना नैवद्य दाखविल्याशिवाय आम्ही सर्व जेवत नाही. आतापर्यंत साईबाबांची माझ्यावर फार मोठी कृपा आहे. त्या कृपेची परत फेड ह्या जन्मात तरी शक्य नाही. साईबाबांच्या लीलांचे कौतुक केल्याशिवाय रहावत नाही.

मे महिन्यातील घटना आहे. माझा दोन नंबरचा मुलगा सुनिल हा तापानी आजारी झाला. त्याचा ताप चढत चालला, त्या तापात तो बरळायास लागला

खाटेवरून पळू लागला, वेडेवाकडे बडबडू लागला, घाबरल्यासारखा करू लागला अंगात ताप जास्त. शेजारीपाजारी म्हणाले त्याला धनुर्वात झाला आहे, त्यामुळे तो असा करतो. मी घाबरले. मी साईबाबांचा धावा केला, हे बाबा माझ्या मुलाला बरे वाटू दे. मी घरात जावून पेला घेतला, त्यात पाणी घेतले व उदी टाकून ते बाबांच्या मुखाला लावले व मुलास पिण्यास दिले. माझ्यावर काही लोक रागावले. त्याला तापात पाणी कशाला देता? काही असो. माझे साईबाबा माझे पाठीशी आहेत व आम्ही सर्वांनी त्यांचा धावा करीत एक-दीड तास त्याला उदी लावीत बसलो, तेव्हा बऱ्याच वेळाने तो शुद्धीवर आला. हळुहळू ताप उतरू लागला. त्यामुळे आम्हाला धीर आला. साईबाबांच्या कृपेने दवाखान्यात घेऊन न जाता त्याला आराम पडत चालला. साईबाबांची आमच्यावर फार मोठी कृपा आहे. ते आमचे डॉक्टर व त्यांचे औषध साईबाबांची उदी, पण विश्वासाने श्रद्धेने घेतली तर ते तावडतोब भक्तांना संकटातून सोडवतात. ही साईबाबांची मोठी कृपा आहे. अशीच त्यांची आमच्यावर कायम कृपा रहावी हीच त्यांचे चरणी विनंती करते.

●

## 'उदीचा प्रभाव'

—श्री बाळाराम पवार
मुकेश मिल कंपौंड, व्हिक्टोरीया बंदर रोड, कुलाबा

● उदी म्हणजे साधी राख नव्हे तर बाबांनी आपल्या योगशक्तीने उत्पन्न केलल्या धुनीतील ती विभूती होय. अर्थात बाबांची दिव्यशक्ती उदीत आहे. उदीने कित्येकांची दुःखे हरण केली आहेत, व कित्येकांचे रोगही बरे केले आहेत. या उदीच्या आश्चर्यकारक प्रभावाविषयी मी एक अनुभव सांगत आहे.

गेली सहा वर्षे माझा उजवा पाय संपूर्ण दुखत होता. मी खूप डॉक्टरी इलाज केले. पण सर्व व्यर्थ, खरा रोग काय होता ते कोणाही डॉक्टरला बरोबर कळले नाही. पायाच्या यातनेने मी रात्रंदिवस करुणपणे किंकाळ्या फोडत होतो. मला उजव्या पायावर जास्त भार देता येत नव्हता. थोडी जास्त चाल पडली की, पाय सारखा दुखत असे. मला नकोसे जीवन करून सोडले होते. पण कुठे माझ्या पुण्याचा साठा होता कोणास ठाऊक!

माझ्या आत्माराम सावंत नावाच्या मित्राने प्रथम मला १३ डिसेंबर १९७४ रोजी शिर्डीला नेले. त्याने मला शिर्डी क्षेत्राची तसेच खास करून बाबांच्या उदीची चांगली माहिती करून दिली. इतरांप्रमाणे माझ्याही दुःखाचे निवारण बाबा करतील अशी खात्री बाळगून मी बाबांची उदी वापरू लागलो. एकदा असाच माझा पाय फार दुखायला लागला. तेव्हा जणू बाबांनीच माझ्या मनाला सुचना केली की, "बेटा! उदी पायावर मळ आणि थोडी खा." मी रोज सकाळ-संध्याकाळ बाबांचे स्मरण करी व बाबांचे नाव घेऊन म्हणे, "बाबा माझ्यावरही कृपा करा. माझा पाय बरा करा." मी सर्व प्रथम हीच मागणी बाबांजवळ केली. मी जवळजवळ महिनाभर उदी माझ्या उजव्या पायावर मळू लागलो. खरोखरच बाबांच्या उदीचा प्रभावच असा की, एका महिन्यातच माझा पाय पूर्णपणे दुखण्याचे बंद झाले. खरोखर म्हणतात ना... "चमत्काराशिवाय नमस्कार नाही" तसे माझे झाले. त्यानंतर मी स्वतः तीन वेळा शिर्डीला गेलो आणि बाबांच्या चरणी हीच विनंती केली की, बाबा निदान वर्षातून एकदा तरी आपल्या चरणाचे दर्शन होवो.

मला हे मुद्दाम लिहावेसे वाटते की, एका मुलीच्या बापाने तर आपली मुलगी मला देण्याचे ठरविले, पण जेव्हा त्याला माझा पाय दुखतो आहे हे कळले तेव्हा त्याने तो बेत रद्द केला. (ही बातमी माझा पाय बरा झाल्यावर दुसऱ्याकडून कळली) पण साईबाबांच्या कृपेने माझा पाय बरा झाला, तेव्हा त्याच मुलीच्या बापाने हुंडा देऊन मला त्याची मुलगी देण्याचे पुन्हा ठरविले. आणि त्याप्रमाणे मला त्याने विचारले देखील. पण मला लग्नच करावयाचे नव्हते. मी त्याला चक्क सांगितले की, मी शिकतो आहे, मला लग्न करावयाचे नाही. तेव्हा खरोखरच माझ्या पुढील आयुष्यात येणाऱ्या अडचणी देखील बाबांच्या उदीने सोडविल्या आहेत. तेव्हा बाबांचे हे ऋण मी कदापि फेडू शकत नाही.

माझा पाय दुखत होता तेव्हा माझ्या किंकाळ्याने माझ्या शेजाऱ्यांना फार त्रास होत होता, पण आमचे शेजारी फार चांगले आहेत. त्यांनी माझ्याविषयी केव्हाच तक्रार केली नाही, उलट माझ्याबद्दल त्यांना दुःख वाटे. पण जेव्हा साई कृपेने माझा पाय बरा झाला तेव्हा मला तर आनंद झाला. पण माझ्यापेक्षा आमच्या शेजाऱ्यांनाही झाला. ते म्हणू लागले, "बिचाऱ्याने खूप डॉक्टर केले व पैसाही खूप खर्च केला. पण एकदाचा झाला पाय बरा." एकाने तर मला विचारले आहे! शेवटी कुठल्या डॉक्टरचा गुण आला? मी लगेच खिशातून बाबांचा फोटो काढला आणि त्याला सांगितले हे माझे डॉक्टर! उदी काढली आणि म्हटले हे डॉक्टराने दिलेले औषध (उदी दाखवून) तो गृहस्थ माझ्याकडे पहातच राहिला आणि म्हणाला, हे काय? तेव्हा मी त्याला बाबांविषयी व उदीविषयी पूर्ण कल्पना दिली.

असाच एक श्री.वसंत वाजे म्हणून माझा मित्र आहे. त्याचे नेहमी-नेहमी पोट दुखत असे. तसेच त्याला केव्हा केव्हा भूतबाधा होत असे. त्याने देखील खूप डॉक्टर तसेच जंतर-मंतरवाले बघितले पण कुणाचाच गुण येईना, शेवटी कोणी एका साईभक्ताने त्याला "शिरडीला जा" म्हणून सांगितले. तेव्हा एकदा माझ्याकडे आला आणि म्हणाला "पवार! आता तू जेव्हा शिरडीला जाशील तेव्हा मला सांग. मी देखील येईन, (मी शिरडीची वारी करतो हे त्याला माहिती आहे.) मी त्याला आश्चर्याने विचारले, का रे! असे का? तो म्हणाला नंतर सांगेन. जवळच रामनवमी येत होती. मी त्याला सांगितले की, मी रामनवमीला जाणार आहे आणि आम्ही दिनांक ९ एप्रिल १९७६ रोजी शिरडीला गेलो. शिरडीचा रामनवमीचा सोहळा पाहून माझ्या मित्राचे मन अगदी थक्कच झाले. त्याला खूप खूप आनंद झाला.

शिरडीहून आल्यानंतर त्यानेही (मित्राने) माझ्याप्रमाणे उदी वापरण्यास सुरुवात केली. आणि काय आश्चर्य! आज मी जेव्हा हा लेख लिहायला घेतला त्याच दिवशी तो माझ्याकडे आला आणि मी काय लिहितो आहे ते वाचू लागला. प्रथम त्याला वाटले की, काही "लव्ह लेटर" लिहीतो आहे. म्हणून त्यांनी प्रथम माझ्याकडे परवानगी मागितली. मी सहज म्हटले काही हरकत नाही. तू वाचू शकतोस. लेख वाचून त्याला असे आढळून आले की, ते लव्ह लेटर नसून बाबांच्या उदीच्या प्रभावाविषयी लेख होता. तेव्हा तो म्हणाला, 'पवार! माझा देखील त्याच्यामध्ये उल्लेख कर.' मी शिर्डीहून आल्यापासून माझे एकही दिवस पोट दुखले नाही किंवा एकही वेळ त्यानंतर भूतबाधा झाली नाही. हे ऐकून मला फार फार आनंद झाला आणि म्हणूनच त्याही अनुभवाला आलेल्या उदीच्या प्रभावाचा उल्लेख करत आहे.

# उदीचा अनुभव

— रमेश डी. चव्हाण
नवापूर, जि. धुळे

● श्री साईबाबांवर माझी असीम श्रद्धा आहे. त्यांचे अनुभव मला नेहमीच येत असतात. काही अनुभव पुढे देत आहे.

१) माझा वडील मुलगा मनोज रमेश चव्हाण हा रस्त्यावर खेळत असताना भरलेल्या बैलगाडीखाली सापडला. त्यावेळी मी शाळेत विद्यार्थ्यांना शिकवीत होतो,

तोच गल्लीतील काही माणसे धावत पळत शाळेत आली व म्हणाली, "गुरुजी, तुमचा मुलगा बैलगाडीखाली सापडला. त्याच्या पायावरून गाडीचे चाक गेले!" हे ऐकताच मी सुन्न झालो. मनात फार घाबरलो, मन थोडे स्थिर ठेवून बाबांना विनंती केली. "बाबा तूच आमचा रक्षणकर्ता आहे. या संकटातून माझ्या मुलाला वाचव! मुलाचा पाय गेला तरी हरकत नाही पण खास जिवंत ठेव."

मनात साईनाम घेत दवाखान्यात गेलो. स्थानिक डॉक्टरांनी मोठ्या हॉस्पीटलमध्ये नेण्यास सांगितले. लगेच चिंचपाडा मिशन हॉस्पीटलमध्ये दाखल केले. तेथील डॉक्टरांनी तपासून सांगितले, "सर, तुमच्या मुलाच्या पायाचा मांसल भाग तेवढा चेंबामेंदा झाला आहे. हाडाला धक्का नाही. ऑप्रेशन केल्यावर एक महिन्यात मुलगा पूर्ववत झाला.

"कृतांताच्या दाढेतून । काढीन मी निजभक्ता ओढून ॥"

आम्हाला वाटले पाय कामातून जाईल, परंतु साईबाबांनी मुलाला संकटातून वाचविले नेहमीच बाबा भक्तांसाठी धावून येतात. त्यामुळे मी संकटाला बिलकूल भीत नाही. कारण—

"साईसारखे असता दैवत। का करावी मी खंत"

२) तारीख १७–१८ आक्टोबर १९७२, माझा दुसरा मुलगा बिपीन उर्फ सुधीर रमेश चव्हाण याची तब्येत अचानक बिघडली. दिवसभर मुलगा खेळायचा, जेवायचा, परंतु रात्र झाली की, खूप ताप भरायचा, रात्री २ ते २–३० च्या दरम्यान झोपेतून खडबडून जागा व्हायचा व लागलीच वाँती व्हायची. दुसऱ्या दिवशी डॉक्टरांचे औषध घेतले. दिवसभर मुलाची तब्येत चांगली. रात्र झाली पुन्हा त्याचवेळी झोपेतून उठला, वांती झाली व अंगात ताप भरला.

या प्रकाराने मी मनातून फार घाबरलो. कारण डॉक्टरांचा उपयोग नव्हता. नक्कीच करणी केली आहे, हे मी समजून चुकलो. काय करावे समजत नव्हते. तिसरा दिवस उजाडला. त्या दिवशीच मुंबईहून 'श्रीसाईलीला' मासिकाचा अंक (अनुभव अंक) आला. त्यात दिल्याप्रमाणे संध्याकाळी चिमटीभर उदी मुलाच्या कपाळाला लावली. पुढच्या दरवाज्यात मुलाला बसवून उदी फुंकली, तसेच झोपताना उशाशी उदीची पुडी ठेवली. (लेख—बाबांची उदी, लेखक—चिपळूणकर गुरुजी, साईलीला अनुभव अंक)

आणि काळजीने आज काय होते ह्या विचारात बसलो, कारण डोक्यात विचार यायचे. आज तिसरा, दिवस दोन दिवसाप्रमाणे व्हायला नको आणि काय चमत्कार! मुलगा आरामात झोपला. दुसऱ्या दिवशी नवसाप्रमाणे नारळ फोडले.

तेथे आपल्या सद्‌गुरु माऊलीच्या भेटीचा आनंद अनुभवीत होती. साई माऊलीच्या दरबारी आल्यावर काय कमी पडणार? तेथे ह्या मंडळींची रहाण्याची, जेवणाची छान व्यवस्था आहे.

३) माझे एक सहकारी, त्यांची मुलगी असाध्य रोगाने पिडीत होती. अनेक मोठमोठ्या तज्ञ डॉक्टरांचे औषध घेतले पण मुलीला बरे वाटत नव्हते. एके दिवशी त्यानी माझ्याजवळ सारी हकिगत सांगितली. मी त्यांना म्हणालो, डॉक्टरांचा उपयोग होत नाही तर श्रीसाईबाबांवर पूर्ण श्रद्धा ठेवा. तुमची मुलगी आठ दिवसात बरी होईल.

बाबांना साकडे घातले. बाबांच्या मूर्तीपुढे बसून प्रार्थना केली व पुडी बनवून दिली. आठ दिवसांनी प्रकृती कशी आहे ते सांगायला या. उदीची पुडी घेऊन ते घरी गेले. सांगितल्याप्रमाणे केले. चार दिवसातच जो रोग डॉक्टराकडून बरा होत नव्हता तो बरा झाला. त्यांनी सत्यनारायणाची पूजा केली, व मला म्हणाले, 'गुरुजी साईबाबांनी हाक ऐकली आता त्यांच्या दर्शनाला शिर्डीला जायचे आहे.'

या प्रमाणे आणखीहि काही अनुभव आले आहेत. शेवटी नम्र विनंती करा-विशी वाटते की, आपणही रोज सकाळ-संध्याकाळ साईनाम घ्या. आरती-भजनपूजन करा. आपली मनोकामना निश्चितपणे पूर्ण होईल ही खात्री. कारण बाबांनी सांगितले आहेच—

" शरण मज आला आणि वाया गेला ।
दाखवा दाखवा ऐसा कोणी " ॥

# 'मैं आपके लोगोंको वहाँ मिला'

– श्री. अंबाजीराव खं. सरोदे
६, उज्ज्वल बिल्डिंग, न. चिं. केळकर पथ,
दादर-२८.

● शिर्डीला आज जाऊ, उद्या जाऊ असे करता करता शेवटी १जानेवारी १९७१ हा दिवस निश्चित ठरवला. ठरवला म्हणण्यापेक्षा तो श्रीबाबानीच ठरवला. कारण त्यांच्या इच्छेशिवाय कोणीही शिर्डीला जाऊ शकत नाही. आता ह्या शिर्डीच्या यात्रेत माझ्या सासूबाई, मेहुण्या, त्यांची मुले, माझी पत्नी व माझ्या दोन मुली असे एकंदरीत १३ जणांचा ग्रुप गेला. माझ्याही मनात जावयाचे होते. पण कामामुळे जाता आले नाही. असो. बाबांची इच्छा.

एखाद्या तृषार्ताला थंडगार पाणी मिळावे, उन्हातान्हातून चाललेल्या वाटसरूला वृक्षाची शितल छाया मिळावी, तसेच मुंबईच्या ह्या धगधगीच्या जीवनातून ही मंडळी

सोय झाली. प्रत्येकाला मनाप्रमाणे अभिषेक करावयास मिळाले. इतक्या दिवसांची शिर्डी साई दर्शनाची इच्छा तृप्त झाली. मन आनंदाने, समाधानाने भरून आले. तसेच तेथे असताना प. पू. उपासनी महाराजांच्या मठात. साकोरीला जाण्याचाही योग आला. बाबांच्या सान्निध्यात ३–४ दिवस चुटकीसरसी निघून गेले. आता परतायला हवं होतं. कारण तिथे प्रपंच वाट पहात होता. शिर्डीवरून निघताना पुन्हा ही मंडळी समाधी मंदिरात श्रीबाबांचे दर्शन डोळे भरून घेऊन ह्या लेकरांना पुन्हा तुझ्या भेटीचा लाभ लवकरच वरचेवर दे, असे सांगून तृप्त मनाने, कृतार्थाने घरी यायला निघाली.

वाचक हो! ज्या दिवशी ही मंडळी शिर्डीहून निघाली. बरोबर त्याच दिवशी सकाळी अकरा वाजता मला मुंबईत श्री बाबांचे दर्शन झाले. त्याचे असे की त्यावेळी मी एका पानवाल्याच्या दुकानातून सिगारेट विकत घेत होतो. इतक्यात माझ्या पाठीवर कोणीतरी हाताने थोपटले. मी चमकून मागे पाहिले. एक वृद्ध गृहस्थ पायात लाकडी खडावा, अंगात पांढरी पैरण व पांढरी लुंगी अशा पोशाखात असलेले मला म्हणाले.

"मैं आपके लोगोंको वहाँ मिला" हे वाक्य मी त्यांच्या तोंडून ऐकले, व दुकानदाराने दिलेली सिगारेट हातात घेऊन पुन्हा मी मागे वळून पाहिले. तो तेथे ती व्यक्ती नव्हती. (त्या व्यक्तीच्या तोंडचे ते वाक्य ऐकून सिगारेट घेऊन पुन्हा त्यांच्याकडे वळून पहाण्याच्या ह्या एक–दोन सेकंदातच ती व्यक्ती जणू काय अदृश्य झाल्याप्रमाणेच मला दिसली नाही.) ती व्यक्ती तेथे न दिसल्यामुळे मला फारच आश्चर्य वाटले. मी दुकानदाराने देत असलेले उरलेले सुटे पैसे सुद्धा परत न घेता तसाच आजुबाजुला त्यांच्या शोधार्थ फिरत असतानाच माझ्या मनात विचार पण येत होते की, आपली माणसे नुकतीच शिर्डीला गेली आहेत, आणि हे गृहस्थ बाबासारखाच पोशाख घालून मैं आपके लोगोंको वहाँ मिला असे म्हणाले. म्हणजे कदाचित् हे श्रीसाईबाबाच असतील. ह्या विचाराने मी आजुबाजूला त्यांचा खूप शोध घेतला, पण व्यर्थ. तशी रस्त्यावर त्यावेळी फारशी रहदारीही नव्हती. तरी ते मला कोठेही भेटले नाहीत. मला अजूनही विश्वास वाटतो, की ते दुसरे तिसरे कोणी नसून प्रत्यक्ष श्रीसाईबाबाच होते. त्यांनी माझ्या कुटुंबाना, व नातेवाईकांना शिर्डीत दर्शन दिल्याची खूण दाखवून मलाही प्रत्यक्ष दर्शन दिले.

खरोखर बाबांचे आपल्या भक्तांकडे किती लक्ष असते. हा प्रसंग आठवला की मन बाबांविषयीच्या कृतज्ञतेने भरून येते व नकळत त्यांच्या चरणी हात जोडले जातात.

# साई-कृपा

—सौ. अहिल्याबाई कृष्णाजी उपरकर
वेलजी ल. चाळ, खो. नं ३३६
७५ वेल व्हीडर रोड, माझगाव–मुंबई नं. १०

● १९५१ पासून मी व माझे पती शिर्डी संस्थानचे सभासद आहोत आणि त्याच प्रमाणे आम्ही साईलीला मासिकाचे वर्गणीदारही आहोत. आम्हाला श्रीसाईबाबांबद्दल सर्व माहिती साईभक्त डॉ. के. बी. गव्हाणकर यांजकडून आज सुमारे २५ वर्षे आहे.

माझा मुलगा चि. महादेव हा फारच मंद बुद्धीचा, त्यामुळे तो शिक्षणात फारच मागे; कसाबसा ११ वी पर्यंत गेला. त्यापूर्वी तो १० वीत असता आय. टी. आय. मध्ये चार ठिकाणी अर्ज भरले. चारही ठिकाणाहून इन्टरव्ह्यूहसाठी बोलावणे आले.

पहिल्या ठिकाणी त्याची सुतार किंवा लोहारकाम शिकण्यासाठी निवड झाली, परंतु त्याची प्रकृती फारच अशक्त असल्यामुळे ती निवड आम्ही नाकारली.

दुसरे बोलावणे अंधेरी आय. टी. आय. मधून आले, त्यावेळी आम्ही साई-चरित्राचा सप्ताह केला होता. साईबाबांच्या कृपेने त्या इन्टरव्ह्यूच्यावेळी, त्याचा एक जुना मित्र त्याच ठिकाणी शिकत होता. तो त्यास भेटला व त्याने त्याचे सर्व काम केले व त्याची फिटरच्या शिक्षणासाठी निवड झाली. त्यानंतर २ वर्षे शिकून तो पास झाला.

त्यानंतर पुन्हा सहा महिने एका रबर कारखान्यात शिकण्यासाठी राहिला व शिक्षण पुरे झाल्यावर त्याच ठिकाणी कामास राहिला. सुमारे १ वर्ष नोकरी झाल्यावर त्याच्या जोडीदाराने चोरी केली, त्याला पकडला, पण त्याने आमच्या महादेवाचे नाव सांगितले. त्यामुळे त्याला कामावरून कमी केले. पण आश्चर्य काय! सुमारे सहा महि-न्यांनी परत त्याला तिथेच कामावर ठेवले. आता तो त्याच कारखान्यात कामावर आहे. ही सर्व साईबाबांचीच कृपा असे आम्ही समजतो. आमच्या घरातील सर्वांना मना-पासून साईबाबांची आवड आहे. ते आम्हावर कोणतेही संकट आले तरी त्याचे निवारण करतात.

●

# पुनः शिर्डीला हांक

– श्री. बापूसाहेब निरखे
१५ नंदलालपूरा, इंदूर

• अजूनही आठवत आहे तो दिवस, १ जून रविवार १९७५. शेजारी राहणाऱ्या आमच्या भाच्याची लेक पहिल्या वेळेलाच आधल्या दिवसापासून दवाखान्यात दाखल झाली होती.

घरातून विचारणे झाले, कालपासून सुमन दवाखान्यात आहे तळमळत आहे. डॉक्टरीणबाई म्हणतात अजून अवकाश आहे वाटते, पुनः एकदा पाहून, भेटून येऊ का ? – म्हटले, वारंवार तब्येतीचे विचारणे, जवळ गर्दी करणे, यामुळे मुलीबाळी, कष्टी होतात असं म्हणतात.

बरं राहिलं बाई, नाही जात! त्या म्हणाल्या.

अशात दुपार ढळली. लक्ष सारे दवाखान्यात होते व पाउले देवघरातील बाबांचे तसबिरीकडे येत जात होती. अन् नजर बाबांवर खिळली होती.

इतक्यात, लहानगी सुरेखा घाबऱ्या घाबऱ्या आली अन् म्हणाली, बापूसाहेब ताई फार फार घाबरली आहे हो! काही तरी करा! म्हणते उदी अंगारा द्या लवकर! आणि रडू लागली. मी सुद्धा मनात घाबरलो, पण धीटपणे म्हटले, घाबरू नकोस बाळ! ये अशी! आहेना आपले साईबाबा? वळलो देवघरात, उचलले तीर्थ आणि उदी, वाटीत ओली केली. बाबांच्या पायाला लावून पळविले तिला दवाखान्यात. ती पळाली, आणि मी, आवाज दिला, हे माझ्या शिरडीच्या बाबा? माझ्या देवा? लक्षात नाहीका आले दुपारपासून? करा सुटका सुमन बेटीची! बाबा! अहो बाबा!! आणि नतमस्तक झालो.

तिकडे दवाखान्यात "उदी तिर्थ" आणले म्हणताच कष्टी झालेली सुमनही आणा ते तीर्थ! म्हणून चटकन पिऊन गेली. तिला भरवसा बाबांचा.

टेबलापाशी नर्सबाई म्हणत होत्या, घाबरू नको मुली, अन बाहेर तिची आई देवाला आळवीत होती. पण वाचून खरे वाटेल का! की थोड्याच वेळात बाळ बाळंतीण मोकळे झालेत. बाहेर आईचा जीव भांड्यात पडला.

दवडत गेलेली सुरेखा, पुनः माघारी पळत आली. पुनः मी घाबरता झालो. तिचा रडका हसरा चेहरा पाहून मी विचारणार तोच ती म्हणाली ताईला बाळ झाले. अन् पळाली पुनः. माझ्या देवा साईनाथा! कशी माझी हाक ऐकली! कुठ होता तुम्ही! अन् कसे सांभाळले आपल्या कृतीने.

# माझे बाबा

-- के. रा. घालगांवकर
गोकुळपेठ–नागपूर,

● इ.स. १९५७ साली मी जेव्हा शिरडीस गेलो तेव्हा केवळ उत्सुकतेपोटी एकाच दिवसात परतावे हाच माझा विचार होता. बरोबर कुटुंबीय मंडळी होतीच. शिरडीस ४-५ दिवस राहण्याचे ठरवले. त्या अवधीत तेथील खंडोबाचे मंदीर, चावडी व द्वारकामाई पाहून घेतली. त्यानंतर परत निघणार तोच तेथील एका माहितगाराने सांगितले की तेथेच लक्ष्मीबाई म्हणून बाबांची सेवा करणारी इतकेच नव्हे तर श्री बाबांची तिजवर बहाल मर्जी असलेली बाई त्यावेळी हयात आहे असे कळले. तिला भेटण्याची तीव्र इच्छा झाली. म्हणून तिच्या घरी विचारपूस करीत गेलो. घरात समोरच बसलेली दिसली. तिला आम्ही सर्वांनी नमस्कार केला. तिने आम्हा सर्वांची आस्थापूर्वक विचारपूस केली. आम्ही तिच्या घरून परत निघणार तोच तिने आम्हाला थांबण्यास सांगितले. तिने मझ्या हातावर चांदीचा कलदार रुपया ठेवला व म्हणाली की "हा रुपया श्री बाबांचा आहे. रुपयास जपा, हरवू नका". तो रुपया घेऊन मुक्कामावर आलो व गावी जाण्याची तयारी केली. आम्ही सर्वजण आमचा प्रवास आटोपून पुलगांवला आलो. तिने दिलेला तो रुपया माझ्या पूजास्थानात असून त्याची नित्यनेमाने पूजाअर्चा होत असते.

या प्रमाणे दोन वर्षाचा कालावधी संपला आणि एकदा आमचे येथील श्री साईभक्तांनी कुठेतरी सहलीला जावे म्हणून ठरवले. पुलगावपासून जवळच 'टाकरखेडा' म्हणून एक खेडेगाव आहे. तेथे "लहानूजी महाराज" म्हणून त्यावेळी एक सत्पुरुष होते. आता ते समाधिस्थ आहेत. त्यांचे दर्शनास जावे म्हणून येथील ज्येष्ठ साई भक्त श्री. दादासाहेब गडकरी यांनी आम्हास सांगितले. तेथे जाण्याची माझी पहिलीच वेळ होती. इतर साईभक्तांबरोबर मीही श्री लहानूजी महाराज यांचे दर्शनास गेलो. तेथे

अशी पद्धत होती की ते महाराज कोणाशीही बोलत नसत, परंतु दुसऱ्या कोणालाही उद्देशून बोलावयाचे असल्यास ते स्वतःशीच बोलत आणि स्वतःच्याच नावाचा उल्लेख करीत. त्यांची भाषा अत्यंत अडाणी पण वऱ्हाडी भाषा-बोली. मी त्यांचे समोर जाऊन त्यांना नमस्कार करून दोन्ही हात जोडून त्यांचेसमोर एक क्षण उभा राहिलो तोच त्यांची नजर माझेवर गेली. माझेकडे पाहून ते स्वतःशीच बोलू लागले, "काय बे लायन्या मीन तुले एक रुपया देल्लाना बे" हे ऐकून मला फार आश्चर्य वाटले. मला काहीच आठवेना की त्यांनी मला कधी रुपया दिला. मी बुचकळयात पडलो. तेवढ्यात ते मला पुन्हा उद्देशून म्हणतात, "काय बे लायन्या, शिर्डीला गेलता ना तू तेथं साई बाबाचा रुपया देल्ला ना बे" मग मात्र माझ्या डोक्यात प्रकाश पडला की आपण शिरडीस गेलो असता लक्ष्मीबाई यांचे हातून मला जो रुपया मिळाला त्याच संदर्भात बोलले होते.

दुसरा प्रसंग असा की प्रतिवर्षी मी दसऱ्याचे दिवशी श्री साईनिर्वाण दिन म्हणून तो सण विशेष स्वरूपात साजरा करीत असतो. आरती नैवेद्य करून अतिथीची वाट पाहून नंतरच मी भोजन करतो. आणि सहसा अतिथीची वाट पाहत असता कोणी ना कोणी अतिथी येतो व त्यास श्रीसाईबाबांचा नैवेद्य अर्पण करीत असतो. गतवर्षी विजया दशमीच्या दिवशी अभिषेक पूजा आटपून आरती करणे सुरू झाली आणि बाहेर फाटक बंद असल्याने एक कुत्रे फाटकाला जोरात धक्के मारीत असलेले दिसून आले. त्याला हाकलून देण्याचा बराच प्रयत्न केला परंतु ते काही केल्या जाईना तेव्हा मला वाटले, आज दसऱ्याचा दिवस, त्यातून श्रीसाई निर्वाण दिन. श्री साई प्रत्यक्षच कुत्र्याच्या स्वरूपात येणार नाहीत कशावरून, म्हणून मी लवकरात लवकर आरती नैवेद्य आटपून श्री साईबाबांचा नैवेद्य त्या कुत्र्यासमोर ठेवला. त्यांनी तो खाल्ला. त्यांनी संतोषपूर्ण नजरेने मजकडे पाहिले व आल्यावाटेने निघून गेले. त्यावेळी मला श्री बाबांचा उपदेश आठवला. "आल्या अतिथा मुठभर द्यावा मागे पुढती पाहू नको" असेच श्री बाबा अन्य स्वरूपात मजकडे नक्कीच येतात. स्वप्नात तर नेहमीच येतात. ●

# श्रीसाई नाथांनी आम्हास वाचवले

—श्री. स. वे. जोशी
बोईगुडा, सिकंदराबाद

● मार्च १९७३ सालाची गोष्ट. नित्य नेमाप्रमाणे झोपण्याच्या आधी बाहेरच्या खोलीत असलेल्या एका मोठ्या साईबाबांच्या फोटो समोर उदबत्ती लावली व नंतर

रोजच्यासारखे झोपलो. झोपून दोन तास झाले असतील, सर्वांस म्हणजे मला, माझ्या सौ. ला व तीन मुलांना अगदी गाढ झोप लागली होती. साडे अकरा वाजले असतील. सौ. ला कोणी उठवण्यास हातानी हालवून म्हणते आहे असा भास झाला. ती त्याच्याकडे लक्ष न देता परत झोपूनच राहिली. परत पाच सात मिनिटाने कुणी तरी तिला जोराने हलवून उठण्यास भाग पाडले. डोळे उघडून पाहाते तर खोलीत धूरच धूर साचलेला होता. गोंधळून तिने मला जाग दिली. मी डोळे उघडतो व पहातो तो काय खाटेच्या लेवलच्या सहा इंच वरपावेतो खोलीत चिक्कार धूर साचलेला होता. घाबरून खाटेवरून उठलो व फर्शीवर बसलो. बसत बसतच मुलांच्या खोलीत गेलो. तिथे पण धुराचा तोच प्रकार पाहिला. सर्वात आधी मुलांना गॅलरीत बाहेर काढावे हा विचार डोक्यात आला. त्याप्रमाणे मुलांना तसेच झोपून देऊन मी गॅलरीचे दार उघडले. सौ. नी एक एक मुलास वेगळे वेगळे जागे करून त्यांना गॅलरीत आणून उभे केले. हे झाल्यावर धुराचे काय कारण असावे हे पाहाण्यास गेलो. लाईट ऑफ करून पाहून परत गॅलरीत यायचे. गॅलरीत येऊन शुद्ध वारा घेऊन व छातीत रोकून परत दुसऱ्या खोलीत जाऊन पहायचे व तिथे तर काही जळत नाही. असे करता करता शेवट अगदी बाहेरच्या खोलीत धाव घातली तेव्हा असे समजले की बाहेरच्या खोलीत साईबाबांचा मोठा फोटो भिंतीला लावलेला होता त्या फोटोच्या खाली असलेला सोफा पेटला आहे; व त्यामुळे सर्व घरात धूर झालेला आहे. खोली बाहेरचे दार उघडावे म्हणजे सर्व धूर बाहेरच्या बाहेर निघून जाईल असा विचार मनात आला. परंतु बाहेरच्या दाराला आतून बंद करण्याकरता विशेष कडी असल्यामुळे धुरात उभे राहून उघड जमेना. गॅलरीतून त्या ठिकाणी श्वास रोखून येण्याचा चारदा प्रयत्न केल्यावर बाहेरचे दार उघडले. मात्र दार उघडताच क्रास वेंटिलेशन प्राप्त झाल्यामुळे सोफ्यानी जास्तीच पेट घेतला. घरातले थोडेफार पाणी उपयोगात आणले व शेजाऱ्यांच्या मदतीने रात्री एक वाजताच्या सुमारास सोफ्याला लागलेली आग विझली.

त्याचे असे झाले की बाबांच्या फोटोला लागलेल्या एका दोरीला उदबत्तीचे घर अडकले होते. त्यात रोजच आम्ही झोपण्याच्या आधी एक उदबत्ती लावून झोपी जात असू. पण नेमकी त्या दिवशी उदबत्ती आणली होती ती अपेक्षाकृत थोडी जाड होती. आम्ही झोपी गेल्यावर ती उदबत्तीच्या घरातून खाली पडली व खाली सोफा असल्यामुळे त्यावर ती तशीच पेटत राहिली. सोफ्याने पेट घेतला. व सर्व घरात धूर साचला.

तो प्रसंग आठवला की असे वाटते की जर सौ. ला जाग आली नसती तर जास्तीत जास्त पाच सात मिनिटात धूर आणखीन घरात भरून आला असता, व आम्ही झोपेमधे असताच गुदमरून मेलो असतो. पण साई ज्याला तारी त्याला कोण मारी याची प्रत्यक्ष प्रचिती आम्हास आली.

# बाबांच्या उदीने मांजरास जीवदान

– श्री. पांडुरंग मिराशे,
पवना, जि. नांदेड

● माझ्या घरात उंदराचा भयंकरच सुळसूळाट झाला होता, व त्यामुळे एकही खाद्य पदार्थ व धान्य शिल्लक रहात नसे. म्हणून मी एक दिवस कंटाळून बाजारातून उंदीर नष्ट करावयासाठी औषधी विकत आणली. ती औषधाची पुडी भातात मिसळून उंदरासाठी बिळात ठेवली. तसेच आमच्या शेजाऱ्याच्या घरात एक मांजर होते ते मांजर आमच्या घरात आले व त्याने तो भात खाल्ला. याची आम्हास मुळीच कल्पना नव्हती, परंतु एक दोन तासानंतर आम्हाला मांजर लोळत असलेले दिसले. ते भयंकर मोठमोठ्याने ओरडत होते. त्याच्या तोंडातून फेस येत होता. आम्हाला कळून चुकले की मांजराने नक्की औषधी मिसळलेला भात खाल्लेला आहे, व आता ते मरणार. त्याची ती तडफड व त्रास पाहून आम्हासही भयंकार दुःख झाले. कारण उंदरासाठी आणलेल्या औषधीमुळे उंदीर न मरता निष्कारण मांजरास मरावे लागत होते. आम्ही मांजरास पाणी पाजले व बरेच उपाय करून पाहिले परंतु त्याची तडफड कमी न होता अधिकच होत होती. आता १० ते १५ मिनिटात नक्कीच मांजर मरणार अशी आमची खात्री झाली होती. तेवढ्यात माझ्या डोक्यात कल्पना आली की अखेरचा उपाय म्हणून साईबाबांची उदी त्याच्या तोंडात टाकावी व डोक्यास लावावी. त्याप्रमाणे साईचे नाव घेऊन ती उदी त्यास पाजली व डोक्यासही लावली. काय आश्चर्य १५ ते २० मिनीटातच मांजरास हुशारी वाटू लागली व त्याची तडफड बरीच कमी झाली. साधारण अर्ध्या तासात तर मांजर इकडून तिकडे उड्या मारून फिरू लागले. श्री साईच्या कृपेमुळेच त्या मांजरास जीवदान मिळाले. धन्य ते साई व त्यांची ती उदी.

# बाबांमुळे परिस्थिती सुधारली

सौ. प्रमोदिनी मो. देशमुख,
रा. तळाशेत, ता. माणगांव, जि. कुलाबा.

● सन १९५४ पर्यंत मला साईबाबांविषयी काहीच माहीत नव्हते. तेव्हा आम्ही परिस्थितीने गांजलो होतो. मी मुंबईस माझे मोठ्या बहिणीकडे गेले होते. तेव्हा तिने

मला श्रीसाईबाबांचा एक फोटो व श्री साई महात्म्य दिले व ते मी नियमीत वाचण्यास सांगितले. मी माझे गावी आल्यावर श्रीसाईबाबांच्या फोटोची रोज पूजा करू लागले. पोथी पण वाचू लागले. त्यानंतर एक वर्षात आमची परिस्थिती सुधारू लागली. माझ्या पतींना धंद्यात यश येऊ लागले. आम्हास शिर्डीस श्री बाबांचे दर्शन घेण्याची फार इच्छा होती. परंतु आम्ही फार लांब खेड्यात राहातो तेव्हा शिर्डीस कसे जाण्यास मिळेल असे मला सारखे वाटावयाचे. परंतु १९५६ साली मे महिन्यात आम्ही आमचे भाच्याचे लग्नास मुंबईस गेलो होतो. लग्न वगैरे झाले व जेवणे चालली होती तेवढ्यात माझे पती अचानक माझेकडे येऊन म्हणाले, आपल्याला आताच्या गाडीने शिर्डीस जावयाचे आहे. तेव्हा मला आश्चर्याचा धक्का बसला. आम्ही रात्रीचे गाडीने शिर्डीस गेलो. शिरडी जवळ येत होती मन बैचेन झाले होते. कधी श्रीबाबांचे समाधीचे दर्शन होते. शिरडीपासून थोडे अंतर होते तोच आमचे एस.टी. गाडीचे चाक निघून बाहेर पडत होते. परंतु श्री बाबांचे कृपेने संभाव्य अपघात टळला. आम्ही पायीच देवळात आलो व श्रीबाबांचे प्रथम दर्शन घेतले. श्रीबाबांचे कृपेने आमची आर्थिक परिस्थिती चांगली आहे. आम्ही साईलीलेचा अंक गेले दहा वर्षे घेत आहोत, त्यामुळे श्रीबाबांविषयी सर्व वाचण्यास मिळते. माझे पती श्री बाबांचे दर्शनास जातात. प्रत्येक सिकपणाचे वेळी बाबांची उदी हेच खरे औषध. श्रीबाबांनी आमची परिस्थिती सुधारून आम्हास प्रत्येक संकटातून वाचविले आहे. श्री साई बाबांची एवढी महती असताना मी काय लिहू हेच कळत नाही. ●

# इच्छा आणि तृप्ती

— सौ छाया जाधव
बी. पी. टी. स्टाफ क्वार्टर्स
रेनॉल्ड रोड, कुलाबा

● चार वर्षांपूर्वी आम्ही उभयता डिसेंबरमध्ये शिरडीला गेलो होतो. तेथे बाबांच्या मंदिरात २ दिवस अगदी मजेत गेले. मंदिरात माझे मन प्रसन्नतेने भरून आले. तसे आम्ही दरवर्षी शिरडीला डिसेंबरमध्ये जात असतो. ह्यावेळी मात्र माझी मुले माझ्या बरोबर नव्हती.

नंतर आम्ही पुण्याहून पंचगणीला जाण्याचे ठरविले. कारण माझे वडील ( कै. डॉ. देसाई ) फार आजारी होते. त्यांना बघून यावे हा विचार! त्या प्रमाणे आम्ही

शिरडीहून सकाळच्या शिरडी-पुणे ह्या एस्. टी. ने दुपारी पुण्याला आलो. एस्. टी. स्टँडवर जणू जत्रेचे स्वरूप आले होते. नाताळ असल्यामुळे सर्व लोक सुट्टीत महाबळेश्वर पांचगणी ह्या थंड हवेच्या ठिकाणी चालले होते. पांचगणी, वाई, महाबळेश्वर ह्या सर्व गाड्यांना चिक्कार गर्दी होती. त्यात आम्ही बिनरिझर्वेशनचे, आम्हाला कोण विचारतो? मी अगदी निराश झाले. मनात बाबांना म्हटले, 'बाबा आता पुढील मार्ग तुम्हीच दाखवा.' इतक्यात एक मुलगा ओरडत आला, २ सिट पांचगणी आहेत का? आम्ही दोघे आश्चर्याने त्याच्याकडे पाहू लागलो. मला अतिशय आनंद झाला. आम्ही तावडतोब आमचे सामान टॅक्सीत ठेवले. टॅक्सी ड्रायव्हरला पाहिले तर तो माझ्या वडिलांच्या परिचयाचाच निघाला. त्याच्या अगोदरच्या २ सिट होत्या. आणखी २ सिटसाठी तो थांबला होता.

बाबांनी ह्या रूपाने आम्हाला सुखरूप घरी पोहोचवले. आम्हाला पाहिल्यावर वडिलांना आश्चर्य वाटले. त्यांना बाबांचा प्रसाद व उदी दिली. त्यांना फार बरे वाटले. बाबा नेहमी म्हणतात– " जो जो मज भजे जैसा जैसा भावे ।
तैसा तैसा पावे मीहि त्यासी ॥

ह्याचा मला वारंवार प्रत्यय येत असतो. ●

# साईकृपेमुळे भयानक संकटातून मुक्तता

— श्री. रामजी पारटकर
पवना जि. नांदेड

● मी दि. ७–३–७६ रोजी माझ्या दुकानात खाटेवर झोपलेला होतो. साधारण सकाळचे ५ वाजले असतील. एक भला मोठा साप एकदम माझ्या पायावर पडला व पायाला जरा मार लागला. माझ्या मुखातून साई नामाचा उच्चार झाला व काय आश्चर्य साप भराभर पायावरून निघून गेला. उठून पहातो तो काय ४ फूट लांबीचा साप बाहेर निघून जात होता. माझ्या पायाला कोणतीच ईजा किंवा दंश झाला नाही. नंतर उठून मी साईबाबांच्या फोटोवर डोके ठेवले. किती हे साईचे उपकार नुसत्या साईच्या नामोच्चारामुळे माझ्यावरील संकट नाहीसे झाले. धन्य ते साई.

माझा दुसरा अनुभव असा आहे. सन १९६९-७० सालातील मे महिन्यातील घटना आहे. माझे दुकान गावातील भरवस्तीत आहे. आजुबाजूस बऱ्याच झोपड्या व घरे आहेत. रात्रीला एका झोपडीस आग लागली व झपाट्याने सर्व झोपड्या व घरे जळू लागली. माझ्या दुकानाच्या आजुबाजूच्या सर्व घरांनी व झोपड्यांनी पेट घेतल्यामुळे

आता माझे दुकानही जळणार हे निश्चित होते. दुकानात श्री साईंच्या तसबीरी व एक मूर्तीही होती. परंतु काय आश्चर्य दुकानाच्या आजुबाजूच्या झोपड्या व घरे संपूर्ण जळाली. परंतु माझ्या दुकानाला अजिबात आग लागली नाही. दुकान व आतील श्रीसाईंच्या तसबीरी व मूर्ती जशीच्या तशी होती. गावातील सर्व लोकांना फारच आश्चर्य वाटले. सर्वांना साईकृपेची साक्ष पटली. या घटनेनंतर बरेच लोक साईभक्ती मार्गाला लागले. त्यांनाही असेच लहान-सहान अनुभव आलेले आहेत व येत आहेत. काय त्या साईंचा महिमा !

● सन १९७० सालातील प्रत्यक्ष घडलेली घटना आहे. मी माझे दुकानात गिऱ्हाईकाना सामान देत बसलो होतो. सकाळचे साधारण १० वाजताची वेळ होती. दुकानात मुळीच गर्दी नव्हती. एवढ्यात एक साधू माझे दुकानात आला. त्याने भगवे मलमली वस्त्र नेसलेले होते. डोक्यावर लांब जटा वाढलेल्या होत्या. दाढीही वाढलेली होती. साधारण २५ वर्षे वयाचा तो साधु तेजस्वी होता. त्यांच्या डोळ्यातील तेज व आनंदी स्वभाव पाहून मला क्षणभर सर्व जगाचा व अस्तीत्वाचा विसर पडला. मी त्यांचे एकदम पाय धरले तेव्हा मला एवढा आनंद झाला की त्याचे मी वर्णनच करू शकत नाही. त्यांचे जवळ एक छोटी खाकी कपड्याची पिशवी होती. त्यांनी ती काढली. नंतर ते म्हणाले की मला दोन गोष्टी सांगावयाच्या आहेत. तेवढ्यासाठी मी तुझ्याकडे आलो आहे. तू जे रोज साईंचे भजन पूजन व नामस्मरण करतोस ते तू रोज सकाळी ४ ते ६ च्या दरम्यान करीत जा. म्हणजे बरे होईल. तसेच त्यानी आत्मज्ञानाच्या पुष्कळच गोष्टी सांगितल्या. त्या सर्व गोष्टी मला पटल्या. साधारण माझ्याशी त्यानी अर्धा तास गप्पागोष्टीतूनच आत्मज्ञान सांगितले. नंतर शेवटी त्यांनी मला आत्मलिंग दिले व ते जपून ठेवण्यास सांगितले. ते अद्यापही मजजवळ आहे. नेमाने मी त्याची पूजा करतो. जाताना ते मला म्हणाले. तू असेच काम करीत जा. तुझे त्यात कल्याण आहे. अजून एके ठिकाणी गावात जावयाचे आहे असे सांगून ते माझ्या दुकानातून मला आशीर्वाद देऊन निघून गेले. नंतर त्यांची शोधाशोध केली असता ते गावात कुठेही मिळाले नाहीत. मला माझी पक्की खात्री आहे की ते श्रीसाईच होते. त्यावेळेपासून मला कुठल्याही गोष्टीची कमतरता नाही. त्यांचीच कृपा म्हणायची.

●